शुक्रवार, १८ ऑगस्ट २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी  दैनिक
वर्ष - ०३  अंक - २२
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● FRIDAY 18 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-22 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# सत्तेमागे जा पण माणुसकी विसरू नका

## शरद पवार : सरकारला शेतकऱ्यांची चिंता नाही

आधुनिक केसरी न्यूज

**बीड : राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार गुरुवारी यांची बीड जिल्ह्यामध्ये स्वाभिमानी सभा झाली. या सभेमध्ये संबोधित करताना ते म्हणाले की, आता वेळ आलेलेली आहे, चुकीच्या लोकांना आवरायचे आहे. सत्तेचा गैरवापर केला जात आहे. सत्तेमागे जा पण माणुसकी विसरू नका. व्यासपीठावर आज काही लोक आहेत ते आमच्याबरोबर राजकारणात नव्हते. पण काहीतरी मुद्दे काढून त्यांना तुरुंगात टाकले जाते. विशेषतः परळीत या गोष्टी अधिक होत आहेत. सत्तेचा गैरवापर करत लोकांना तुरुंगात डांबून कोणी वेगळे राजकारण करत असेल त्यांना उलथून टाकण्यासाठी कधीही वेळ लागणार नाही. ते करायला आमचे लोक तयार झाल्याशिवय राहणार नाहीत, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्वाभिमानी सभेत बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी दिला.**




शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, बऱ्याच दिवसांनी आज बीडला संदीप क्षीरसागरांनी आयोजित केलेल्या सभेला उपस्थित राहता आले. तुम्ही लोकांनी केलेले उत्स्फूर्त स्वागत पाहून मला जुन्या काळाची आठवण झाली. ती आठवण म्हणजे निष्ठेच्या बाबतीत बीड कधीही तडजोड करत नाहीत त्यांच्या पाठीशी जनता उभी राहते हे संदीप क्षीरसागर यांनी दाखवून दिले. असे शरद पवार साहेब यांनी यांचे कौतुकही यावेळी केले आहे शरद पवार यावर सविस्तर बोलताना म्हणाले की, महाराष्ट्रात आम्ही यशवंतराव चव्हाण यांच्या विचाराने काम करत होतो. त्यावेळी खऱ्या नेतृत्वापेक्षा काही लोकांनी वेगळी भूमिका मांडायला सुरुवात केली. सामान्य जनता अस्वस्थ होते. त्यावेळी बीडचे नेतृत्व केशरकाकू क्षीरसागर यांच्याकडे होते. त्यांनी भूमिका घेतली की, नेत्याच्या निष्ठेच्या संदर्भात मी तडजोड करणार नाही. त्याला जमेल ते करावे लागले पडेल ती किंमत मोजावी लागली तरी चालेल. पण मी भूमिकेपासून मागे हटणार नाही, अशी भूमिका केशरकाकूंनी घेतली होती. तीच स्थिती काकूंचे नातू संदीप क्षीरसागर यांनी आणली याचा मला आनंद आहे, असेही शरद पवार साहेबांनी यावेळी म्हणाले. शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, चमत्कारिक लोकांच्या हातात आज सत्ता आहे. कष्टकऱ्यांबाबत त्यांना आस्था नाही. समाजात फूट पाडण्याची त्यांची भूमिका आहे. आज देशात किती प्रश्न आहेत. महागाई, खताच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. शेतकरी आज अडचणीत आहे. पण सरकारला चिंता नाही. कायदा व सुव्यवस्थेची चिंता सरकारला नाही. मणिपूर, नागालँड, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेची समस्या आहे. मणिपूरमध्ये समाजात गावांत भांडणे झाली. अनेकांच्या घरांवर हल्ले केले जात आहेत. स्त्रीयांची धिंड काढली जात आहे. पण भाजप सरकार कोणतेही पाऊल उचल नाही. देशाच्या पंतप्रधानांनी मणिपूरला जाण्याची आवश्यकता होती. पण त्यांनी तिकडे ढुंकूनही पाहिले नाही. अधिवेशनात अवघे तीन मिनिटे बोलले. पण पंतप्रधानांनी मणिपूरच्या भगिनींचे दुःख जाणून घेतले नाही, असेही यावेळी बोलताना शरद पवार यांनी म्हटले आहे.

# सिद्धार्थ प्राणीसंग्रहालयातील 'राजा' गेला



आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सिद्धार्थ उद्यानातील राजा नावाचा बिबट्या (वय १५ वर्षे) हा १६ ऑगस्ट रोजी रात्री मरण पावला. सदर बिबट्या मागील दोन महिन्यापासून आजारी होता. राजा बिबट्याला आमटेज् ॲनिमल आर्क्स, हेमलकसा गडचिरोली येथून २०१६ मध्ये प्राणीसंग्रहालयात आणण्यात आले होते. त्यावेळेस त्याचे वय अंदाजे ७ ते ८ वर्षे होते. त्याचा प्राणीसंग्रहालयामध्ये ७ वर्षे वावर होता.

आजारी राजावर प्राणीसंग्रहालय पशुवैद्यक डॉ. निती सिंग यांच्यामार्फत उपचार करण्यात येत होते. या बिबट्याच्या रक्ताचे नमुने प्रयोगशाळेत तपासून आजारी बिबट्यावर उपचार करण्यात येत होते. परंतु उपचारास प्रतिसाद न मिळाल्याने दि.१६ ऑगस्ट रोजी राजाने अखेरचा श्वास घेतला.

या बिबट्याचे शवविच्छेदन आज दि. १७ ऑगस्ट रोजी सकाळी डॉ. अमीतकुमार दुबे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, डॉ. रोहीत धुमाळ व डॉ. महेश पवार पशुधन विकास अधिकारी, शासकीय पशुसर्व चिकीत्सालय, छत्रपती संभाजीनगर यांनी केले. मृत बिबट्याच्या शवाची विल्हेवाट लावण्याकरीता डी. बी. तौर, वनपरिक्षेत्र अधिकारी व ए. डी. तांगड, वन परिमंडल अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्या समक्ष मृत बिबट्यावर अंत्यविधी करण्यात आले.

# परळी वैजनाथ रेल्वे स्थानकाचा कायापालट करू

## डीआरएम भरतेश कुमार जैन : उच्च दर्जाच्या अधिकाधिक रेलसेवा देऊ

आधुनिक केसरी न्यूज

**परळी वैजनाथ :** मध्य रेल्वे झोन अंतर्गत सिकंदराबाद चे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डिव्हिजनल रेल्वे मॅनेजर - डीआरएम) भरतेश कुमार जैन हे गुरुवारी सकाळी परळी वैजनाथ रेल्वे स्थानकावर विशेष निरिक्षण दौर्यानिमित्त आले होते. परळी रेल्वे संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने त्यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांना आपल्या काही विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन सादर केले. त्या मागण्या बाबतीत त्यांना चर्चेद्वारे योग्य ती जाणीव करून दिली. त्यास त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्या वेळी बोलताना डीआरएम जैन यांनी परळी वैजनाथ रेल्वे स्थानकाचा कायापालट करून येथे प्रवाशांना अद्ययावत आणि उच्च दर्जाच्या रेल्वे सेवा देण्याचे निःसंदिग्ध आश्वासन या शिष्टमंडळास दिले. रेल्वे संघर्ष समितीचे अध्यक्ष श्री चंदुलाल बियाणी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात खालील प्रमुख



मागण्यांचा समावेश होता.

नांदेड - पनवेल, निजामाबाद - पंढरपूर व इतर गाड्यांचे स्लीपर कोठे आणि जनरल कोचेस वाढवावेत ; १७६१४/१३ नांदेड पनवेल गाडी पुढे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई किंवा लोकमान्य टिळक टर्मिनस कुर्ला पर्यंत तर १२७४९/५० मछलीपट्टणम बीदर, १७०१०/०९ हैद्राबाद बीदर इंटरसिटी, १६५७१/७२ यशवंतपूर बीदर, १७६६३/६३ तांडूर परभणी एक्स्प्रेस इत्यादी गाड्या परळी वैजनाथ पर्यंत विस्तारित कराव्यात, शिवाय ५१५२६/२५ मिरज परळी वैजनाथ पुढे परभणी जंक्शन पर्यन्त तर ५७५२२/२१ पूर्णा परळी वैजनाथ गाडी पुढे बीदर किंवा कुर्डुवाडी जंक्शन पर्यन्त करावी, तसेच परळी वैजनाथ शहराच्या पूर्वेला टाकण्यात येणाऱ्या नियोजित बायपास लाईन तथा कॉर्ड लाईन वर नवीन अत्याधुनिक रेल्वे स्थानक त्वरित बांधण्यात यावे, विकाराबाद जंक्शन ते परळी वैजनाथ रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाबरोबरच परभणी जंक्शन ते परळी वैजनाथ आणि लातूर रोड जंक्शन ते कुर्डुवाडी जंक्शन रेल्वे स्थानकापर्यंतच्या रेल्वे मार्गांचे देखील दुहेरीकरण करण्यात यावे, परळी वैजनाथ स्थानकाच्या दोन्ही प्लॅटफॉर्म वर स्वयंचलित सरकते जिने - एस्कलेटर बसवावेत येथील रेल्वे स्थानक परिसरात सुलभा इंटरनॅशनलच्या धर्तीवर स्नानगृह व स्वच्छता गृह बांधावेत; आरक्षण कक्षाची कामाची वेळ सध्याच्या आठ तासांहून अधिक म्हणजे किमान सलग बारा तास तरी करावी, यावेळी निवेदन देताना रेल्वे संघर्ष समितीचे अध्यक्ष चंदुलाल बियाणी, संजय आघाव, जी एस सौंदळे ,सत्यनारायण दुबे, हिरालाल बोरा, आत्मलिंग शेटे, आश्विन मोगरकर, प्रकाश चव्हाण, ओमप्रकाश बुरांडे, प्रकाश वर्मा, शरद कावरे यासह आदींची उपस्थिती होती.

## आधुनिक केसरी वॉच..

# पत्रकारितेची मुस्कटदाबी करु पाहणाऱ्यांच्या विरोधात ' व्हॉईस ऑफ मीडियाचा ' आवाज राज्यभर घुमला

## अन्यायग्रस्त पत्रकार संदीप महाजन यांनी मानले आभार

VOICE OF MEDIA


आधुनिक केसरी

जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारत देशाला ओळखल्या जाते. आणि त्या लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून भारतीय पत्रकारितेकडे संपूर्ण जग सन्मानाने पाहते. कारण घडलेली घटना जशीच्या तशी पोहोचवणे आणि कोणाचीही बाजू न घेता घटनेच्या सर्व बाजू निष्पक्षपणे लोकांसमोर मांडणे हा आपल्या पत्रकारितेचा गाभा आहे. म्हणूनच भारतीय लोकशाहीवर माध्यमांचा मोठा प्रभाव आहे. परंतु सद्यस्थितीत मात्र, सत्य अपचनी पडणाऱ्या काही गुन्हेगारी प्रवृत्ती असणाऱ्या राजकीय लोकप्रतिनिधी आणि माफिया गुंडांकडून निर्भीड पत्रकारितेची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. गेल्या काही दिवसात अनेक पत्रकारांवर जीवघेणे हल्ले करून लोकशाहीचा चौथा स्तंभ कमकुवत करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केल्या जात असल्याचे स्पष्ट होत आहे. नुकताच जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथील पत्रकार संदीप महाजन यांच्यावर झालेला भ्याड हल्ला हे ताजे उदाहरण आहे. तथापि पत्रकारिता आणि पत्रकार यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचार विरुद्ध लढा देणाऱ्या व्हॉईस ऑफ मीडिया ने पत्रकार संदीप महाजन यांच्या वरील हल्ल्याची दखल घेतली आहे. संघटनेचे हायकमांड संदीप काळे यांचा आदेश मिळतात सर्व सरदार, सैनिक या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ रस्त्यावर उतरल्यामुळे व्हॉईस ऑफ मीडियाचा आवाज राज्यभर घुमला आहे. या आंदोलनाची दखल सर्वांनी घेतल्यामुळे अन्यायग्रस्त पत्रकार संदीप महाजन यांनी व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांना प्रेमाचे पत्र पाठवून संपूर्ण व्हॉईस ऑफ मीडिया परिवाराचे आभार मानले आहेत.




दिवसागणिक पत्रकारांवर होत असलेल्या हल्ल्याच्या घटनांकडे विश्लेषणात्मक दृष्टिकोनातून बघितल्यास, सध्याचे सत्ताधारी निवडकपणे देशातील लोकशाहीच्या संस्थांना खिळखिळे करण्याचा हेतूपुरस्पर प्रयत्न करत असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यांच्या वैचारिक₹राजकीय वाटचालीत पत्रकारांनी अडथळा आणू नये, अशी काही गुंड प्रवृत्तीच्या लोकप्रतिनिधींची धारणा असल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे. त्यांच्या विरोधात अथवा हिताच्या आड येणारी बातमी लिहिल्यास, त्याचे किती गंभीर परिणाम भोगावे लागतात हेच पत्रकार संदीप महाजन यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्यातून उजागर होत आहे. खऱ्या अर्थाने बघितल्यास पत्रकार हा समाजाचा आरसा असतो. कारण प्रत्येक घटनेचे वार्तांकन निर्भीड व निष्पक्षपणे करून तो समाज व शासन तसेच प्रशासनाच्या समोर मांडत असतो. एवढेच नव्हे; तर वेळप्रसंगी अति संवेदनशील भागात जाऊन, आपला जीव धोक्यात घालून, धोका पत्करून पत्रकारिता करत असतो. किंबहुना यात अनेकांना आपला जीव गमवावा लागला असल्याचे महामारीच्या काळातील अनेक उदाहरणे सर्वश्रूत आहेत. याची समाजाने आणि शासनाने दखल घ्यावी, यासाठी कुठेतरी लढा उभारल्या जावा. ही संकल्पना ज्येष्ठ पत्रकार तथा लेखक संदीप काळे यांच्या मनात आली. आणि व्हॉईस ऑफ मीडिया नावाची चळवळ देशभर सुरू झाली. या चळवळीच्या माध्यमातून आज पत्रकार संदीप महाजन यांच्या वरील हल्ल्याच्या निषेधार्थ संपूर्ण महाराष्ट्र रस्त्यावर उतरला आहे हे विशेष..!

माझ्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याचा संपूर्ण महाराष्ट्रासह, देशभरातून विविध राजकीय, सामाजिक, पत्रकार संघटनांनी निषेध व्यक्त करून ठिकठिकाणी आंदोलन केले . त्यात व्हॉईस ऑफ मीडियाचे आंदोलन विशेष लक्षवेधी ठरले . संघटनेच्या महत्त्वपूर्ण भूमिकेमुळे मला ताकद मिळाली असून, दहशतवादी प्रवृत्ती, भ्रष्टाचार, गुंडगिरी यांच्याविरुद्ध लढण्याची व सत्य लिहिण्याची एक नवी प्रेरणा मिळाली . आता माझी लढाई एकट्याची राहिली नसून संपूर्ण पत्रकार परिवाराची आहे . मी व्यक्तीशः व माझा परिवार आभारीच नव्हे, तर ऋणी आहे . . !
**संदीप दामोदर महाजन, ( पत्रकार, पाचोरा, जि .जळगाव )**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

त्यानंतर सगळ्या शेतजमिनीची वाटणी व्हायची. गावातील जमिनीच्या एक चतुर्थांश जमीन तशीच ठेवली जायची बरं का ! ही जमीन गायरान म्हणून वापरली जायची. बाकी जमिनीत सर्वांच्या सहकार्याने बारमाही, सहामाही, चारमाही अशी पिके घेतली जायची. शेतात लागवड आणि पिकांची जोपासना करण्यासाठी सगळे एकमेकांना मदत करायचे. मग कापणीनंतर पीक सर्वांमध्ये वाटले जायचे. यात बारा बलुतेदारांना पण त्यांचा हिस्सा दिला जायचा. या पद्धतीचे खूप फायदे होते. सर्वांना पाहिजे तशी पिके लावली जायची. त्यामुळे जास्त उत्पादन किंवा अपव्यय टाळला जायचा.

शिवाय जमिनीचा कस टिकून राहायला मदत व्हायची. गायरानाची जमीन सुद्धा दरवेळी बदलली जायची. सर्वांच्या गरजा भागायच्या. गावे सर्व बाबतीत स्वावलंबी व्हायची. गावात कोणी उपाशी, भिकारी किंवा बेरोजगार राहात नव्हता. यापेक्षा सहकाराचे सुंदर उदाहरण दुसरे कोणते असू शकेल ? चला, आता आपण थोडा ब्रेक घेऊ या. जेवण घेऊन मग पुढे जाऊ या. ' बाबा म्हणाले. हेमाडपंती मंदिराला भेट, त्यानंतर सोपानरावांकडे एक दिवस मुक्काम आणि त्या दरम्यान गावातील लोहार, कुंभार आदींना भेटणे या सगळ्या गोष्टी पहिल्यांदाच बघायला मिळाल्याने राजेश आणि पिंकी खुशीत होते. त्यांना खूप नवनवीन माहिती पण मिळाली होती. लिंब, वड, पिंपळ या सारख्या झाडांचे महत्व, बेलाच्या पानांचे महत्व ही सगळी माहिती त्यांना नवीन होती. श्यामराव आणि श्यामलाताईंनी त्यांना सतत वेगवेगळी माहिती देण्याचा प्रयत्न केला होता. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात शेकडो वर्षांपासून असणाऱ्या बारा बलुतेदारांची माहितीही त्यांना मिळाली होती. दुपारी जेवण घेतल्यानंतर त्यांचा परतीचा प्रवास सुरु झाला. रस्त्याने हिरवीगार शेतं डोलत होती. सगळीकडे जणू हिरवाईची चादर आच्छादली होती. कुठे शेतात केळी तर कुठे ऊस, कुठे कपाशी, ज्वारी, बाजरी आदी पिके वाऱ्यावर डोलत होती. कुठे कुठे भाज्यांची लागवड केलेली दिसत होती. ते सगळे पाहिल्यानंतर पिंकीला सोपानकाकांकडच्या जेवणाची आठवण झाली. ती म्हणाली, ' आई, त्या काकांकडे भाकरी आणि इतर सर्वच पदार्थ किती चवदार होते नाही ? ' 'अग पिंकी, सोपानकांकांकडे त्यांच्या शेतात निर्माण झालेलं धान्यच जेवणासाठी वापरतात. त्यांच्याकडे खास गावरान ज्वारी, बाजरीची लागवड ते त्यासाठी करतात. ' श्यामलाताई म्हणाल्या. ' आई, गावरान ज्वारी, बाजरी म्हणजे काय ग ? ती वेगळी असती का ? ' राजेशने विचारले.



समृद्ध प्राचीन वारसा



## आनंदी पहाट

## व्यक्तींमधील गुणसमुच्चयाचा विचार करावा

आधुनिक केसरी

वक्तृत्व, कर्तुत्व, नेतृत्व ह्या तिन्हीची गरज प्रत्येक ठिकाणी, सर्वच क्षेत्रांत असते. घरात, कुटुंबात, नोकरीत, व्यवसायांत, उद्योग धंद्यात, समाजकारणात आणि राजकारणांत देखील त्याची जरुरी असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

कुशलतेने वक्तृत्व, कर्तुत्व आणि नेतृत्व ह्या तिन्हीचा योग्य उपयोग करणारी व्यक्ती स्वतः तर प्रगती करतेच, शिवाय आपल्या बरोबर

इतरांच्या प्रगतीला, उत्कर्षाला, उन्नतीला, विकासाला कारणीभूत ठरत असते. आपल्यापैकी प्रत्येकामध्ये वक्तृत्व, कर्तुत्व आणि नेतृत्व हे सर्व गुण असतातच परंतू त्याचा योग्यवेळी वापर करण्याची जाणीव आपल्याला होत नाही. दैनंदिन जीवनांत देखील आपल्याला अनेक प्रकारे त्यांचा वापर करून किमान आपल्या स्वतःचा सर्वांगीण विकास करून प्रगती साध्य करणं शक्य होऊ शकतं, पण आपलं तिकडे लक्षच नसतं. आपल्याला त्याची जाणीव होत नसते. आपल्या प्रगतीचं गुपित कशांत आहे, हे न कळण्याचीच उणिव आपल्यात असते. एखाद्या घरगुती कार्यक्रमाचं देखील नेतृत्व करताना, त्या कार्यक्रमांत सूत्रसंचालन करताना आवश्यक वक्तृत्वाच्या बाबतीत आपण उदासीनता दाखवत असतो. त्यामधून आपल्या कर्तुत्वाची एखादी झलक आपण दाखवू शकत नाही, हाच कळीचा मुद्दा आहे.

ज्या व्यक्तीनं वक्तृत्व, कर्तुत्व आणि नेतृत्व ह्या तीनही गुण समुच्चयाचा अभ्यासपूर्वक विचार केलेला असतो, त्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व चार चौघांपेक्षा निश्चितच निराळं असल्याचं दिसून येतं. नेतृत्व करू इच्छिणाऱ्या व्यक्तीमध्ये वक्तृत्व आणि कर्तुत्वाची जोड असावीच लागते. ह्या दोन्हीमधून त्या व्यक्तीच्या आत्मविश्वासाची ओळख होत असते. आत्मविश्वास असल्याशिवाय वक्तृत्व आणि कतृत्व प्राप्त होऊ शकत नसल्याचं आपल्याला अनेकदा अनुभवायला येत असतं. नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीचे विचार, वर्तन आणि व्यवहार त्या व्यक्तीच्या वक्तृत्व आणि कर्तुत्वामधून दिसून येत असतात. तेच त्या नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व असतं.



आधुनिक केसरी

**सद्गुरूचि मौन | सिद्ध केले ||**
देहाच्या विकारा | वैद्याचा उतारा ||
गवसेना थारा | मनासाठी ||१||
चंचल मानाला | विषयांचा मारा ||
मायेचा पसारा | भोवताली ||२||
झाले तिर्थधाम | यज्ञयाग केले ||
तरी नाही झाले | समाधान ||३||
मृगजळी सुख | मिथ्या या संसारी ||
मन अधांतरी | फिरू लागे ||४||
ज्ञानेशाची ओवी | तुक्याचा अभंग ||
सापडला संग | वारी मध्ये ||५||
मनाच्या गाभारी | सापडली खूण ||
सद्गुरूचि मौन | सिद्ध केले ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

विद्यादात्री धनंदात्री तव रूपाणि मातृके|
दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम्|| ६८
|| हे ,आते, विद्यादात्री, धनदात्री ही तुझी रूपे आहेत. दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

## घराघरात स्ववेंद, मनामनांत स्ववेंद, जनमनांत स्ववेंद !



स्ववेंद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

भक्ति तदन्तर प्रेम है, बाहर से क्या काम ।
रोम रोम भीना रहे, निशिदिन आठो याम
।।१९।।(स्ववेंद चतुर्थ मण्डल तृतीय अध्याय)
०४/०३/१९
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
भक्ती हा आत्म्याचा विषय आहे, ती अंतरंगातील प्रेमाने होते. बाह्य वेश आणि कर्माशी तीचा काहीही संबंध नाही. जेंव्हा भक्ती प्राप्त होते, तेंव्हा सहज योगी रात्रंदिवस, चोवीस तास एक स्वरूप त्या रंगात रंगलेला असतो आणि त्यात तो लीन होत ऊर्ध्वमुख होऊन शांत व संतुष्ट होऊन जातो. देहाच्या सर्व क्रिया त्या भक्तीच्या आनंदात भिजून आत्म्याच्या अनुरूप होतात आणि योगाग्नित प्रदीप्त झालेला योगी महान तेजाने पूर्ण होऊन दैदिप्यमान होऊन जातो. हाच रोम-रोम भीना रहे चा अर्थ आहे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## आत्मदर्शन

आधुनिक केसरी

"आत्मदर्शन" हरीःॐ नमस्ते गणपतये। त्वमेव प्रत्यक्षं तत्वमसि। गणपती अथर्वशीर्षची सुरवात आहे. यामध्ये "तत् त्वम् असि"---म्हणजे ते तू आहेस. "सोहम"म्हणजे तो आत्मा मीच आहे. तूंच शाश्वत ब्रम्ह आहेस. हा या महावाक्याचा खरा अर्थ होय. संतांच्या विचारांचा आदर्श जर आपल्या जगण्यावर ठेवला तर समर्पण म्हणजे काय हे समजायला वेळ लागत नाही मित्रांनो. महाभक्त प्रल्हाद हा कष्टवीला। म्हणोनी तया कारणे सिंह जाला। न ये ज्वाळ वीशाळ संन्नीध कोणी। नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी।। समर्थांनी प्रल्हादाला महाभक्त म्हणले आहे. का म्हणले असेल ? तर महाभक्त प्रल्हादाचे अलौकिक मोठेपण असे आहे की त्यांनी नरसिंह भगवान प्रसन्न झाले असताना आपल्या एकट्याचाच उद्धार व्हावा असे देवापाशी मागणे मागितले नाही .




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## बद्ध आणि मुक्त यांतला फरक

आधुनिक केसरी

बद्ध हे जगाचे असतात. मुक्त हे जगाचे नसून एका भगवंताचे असतात. संतांची चवकशी करताना, त्याची उपासना कोणती, गुरू कोण हे पाहतात. त्याच्या आईबापांची नाही चौकशी करीत. संतांना देहाची आठवण नसते. ते आपला देहाभिमान, मीपण, भगवंताला देतात. परमात्म्यापेक्षा विषयाची गोडी ज्याला जास्त तो बद्ध. विषयाचे प्रेम कमी होणे म्हणजे मुक्तदशेच्या मार्गाला लागणे, ' मी भगवंताचा ' म्हटले की तिथे बद्धपणा संपला. आपण बद्ध आहोत हे तरी आपणच बद्ध आहोत ही भावना करून घेतली म्हणून. आपण, मूळ तेच रूप स्वयंसिद्ध असताना, सर्व इंद्रिये मिळून होणारा देह मी आहे असे म्हणतो; आणि त्यामुळे देहाला जे सुखदुःख होते ते आपल्याला झाले असे म्हणतो. आत्मा स्वतः त्यापासून अलिप्त असतो. परंतु आत्मा आणि देह वेगळा नाही असे आपण म्हणत असतो; म्हणून मी तोच देह आणि हा देह तोच आत्मा, अशी आपली भावना दृढ झालेली असते. परंतु आपण बोलण्यात मात्र ' माझा ' हात दुखावला किंवा 'माझ्या ' पोटात दुखते, असे म्हणतोच की नाही ? म्हणजे, प्रत्येक अवयव 'माझा' म्हणणारा कुणीतरी वेगळा आहे हे खरे; आपल्याला ते बरोबर समजत नाही इतकेच. मीपणा हा आपल्यात इतका बाणलेला असतो. आपले मन विषयाच्या आनंदात रंगले, म्हणून तिथे आपण आपलेपणाने वागतो. परंतु विषयच जिथे खोटे, तिथे मन रंगूनही, ते नाहीसे झाले म्हणजे आपल्याला दुःख हे होणारच. आपण दुसऱ्यावर अवलंबून राहिलो म्हणूनही सुखदुःख



होते. म्हणून , आपण त्या सर्वांपासून निराळे आहोत असे समजून वागावे. हे होण्यासाठी परमेश्वराची भक्ति करायला पाहिजे. भक्तिला जर काही आड येत असेल तर आपली देहबुद्धीच होय; आणि ती गेल्याशिवाय खरी भक्ति होणारच नाही. तरी आपण परमेश्वराचे आहोत असे समजून वागावे. जे जे होईल ते ते त्याची इच्छा म्हणून झाले असे समजून वागू लागलो, म्हणजे आपली देहबुद्धी हळूहळू कमी होत जाईल. याकरिता काही तप, याग वगैरे करावे लागत नाही. संसार सोडून वनातही जावे लागत नाही आणि विशेष आटाआटीही करावी लागत नाही. जे घडते ते ' मी केले' हा मीपणा टाकून, ' मी देवाचा आहे ' असे म्हणून, आणि जे होईल त्यात आनंद मानून राहावे, म्हणजे मीपणा सुटत जाईल. हे ' मी ' केले नाही, परमात्म्याच्या इच्छेने झाले, असे मानले म्हणजे मीपणा राहिला कुठे ?

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७


लांब उडी घेण्यापूर्वी चार पावले मागे जावे लागते, परिसापाशी सोने व्हायला रुप्याचे लोखंड व्हावे लागते; तसे, गुरूचा पाठीराखेपणा असून आपल्याला जी अधोगतीशी वाटते, ती पुढच्या महत्कार्याची पूर्वतयारीच होय. बाप मुलाला हातावर घेऊन पोहायला शिकवीत असताना मधून मधून हात काढून घेतो, पण मुलाची खात्री असते की हा आपल्यला बुडू देणार नाही, तसा आपल्याला सद्गुरूचा आधार आहे अशी आपण पक्की खात्री बाळगावी. भगवंताची सेवा एक परी सोपी आहे. पण गुरूची सेवा करणे फार कठीण आहे. नाथांनी खरी गुरूची सेवा केली. कल्याणांनी खरी गुरु सेवा केली. स्पष्ट सांगावयाचे म्हणजे खरा शिष्य मिळणेही कठीण गोष्ट आहे. देह बुद्धी नाहीशी झाल्या शिवाय पूर्ण गुरु सेवा घडत नाही, आणि गुरु सेवेत देह झीजल्या वाचून देह बुद्धी पूर्ण नष्ट होत नाही. एक मुलगा होता, त्याला त्याच्या वडिलांची पत्रे येत असत. तो पत्र वाची आणि देव्हाऱ्यात ठेवून देई.

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

गुणगौरवमायाति नोचैरासनमास्थितः ।
प्रासादशिखरस्थोऽपि काको न गरुडायते ॥
सरलार्थ - ( पुरुष ) गुणांनी गौरवाला चढतो. गुणहीन मनुष्य उच्चासनावर बस म्हणून त्याला गौरव मिळत नाही. कावळा उंच महालाच्या शिखरावर बसला, म्हणून त्याला गरुडाची योग्यता प्राप्त होत नाही.
स्पष्टीकरण - वर्णाने, पोषाखाने आणि बाह्य देखाव्याने सामान्य मनुष्य मोठेपणाचा आव आणीत असला तरी, तो मोठा ठरत नाही. मोठपणा मिळण्यासाठी अंगी श्रेष्ठ गुण असावे लागतात.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे



'पक्षी दूर देशी गेलं' ना.धों. महानोरांना काव्यमय आदरांजली..! पान ६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, १८ ऑगस्ट २०२३




मुलांचे भावविश्व समृद्ध करणारी 'हसरी शाळा' पान ७


# साहित्यिक, विचारवंतांनी निर्भीडपणे व्यक्त व्हावे

## सुभाष वारे : अण्णासाहेब मगर महाविद्यालयात प्रा. हरी नरके यांना आदरांजली

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** हरी नरके यांनी पुस्तकं वाचण्या, लिहिण्याबरोबरच समाज वाचत सत्यशोधन केले. आज सत्यशोधक विचार, संविधानाला सुरुंग लावण्याच्या काळात साहित्यिक, विचारवंत यांनी भूमिका घेऊन निर्भीडपणे व्यक्त व्हायला हवे. मनुवादी संस्कृती, विधिनिषेध यामुळे आपला देश मागास राहिला आहे. म्हणून आजपासून आपल्या घरी पुरोहित येऊ देऊ नका असा संकल्प करा असे आवाहन संविधान अभ्यासक सुभाष वारे यांनी केले. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी जेष्ठ विचारवंत, साहित्यिक, वक्ते प्रा. हरी नरके आदरांजली अर्पण करण्यासाठी मराठी विभाग व माजी विद्यार्थी संघटना यांच्या वतीने अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी सुभाष वारे बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी हरी नरके यांचे वक्तृत्व, अभ्यासू वृत्ती व चिकाटी हे गुण विद्यार्थ्यांनी घ्यावेत असे सांगितले.

माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर यांनी हरी नरके यांनी माझ्या विरुद्ध विठ्ठल तुपे यांचा प्रचार केला आणि मी निवडणूक हरलो. त्याकाळी ज्याच्याकडे चांगला वक्ता तो निवडणूक जिकायचा. माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष सुरेश घुले यांनी हरी नरके यांनी समता परिषद, ओबीसी आरक्षण, फुले शाहू आंबेडकर ग्रंथ निर्मिती या विषयी भरीव कामगिरी केल्याचे सांगितले. तसेच माजी सरपंच विलास तुपे, माजी नगरसेवक सुनील बनकर, साखर संकुलचे सह संचालक शिरीष तळेकरी, डॉ. शोभा पाटील, प्राचार्य महादेव वाल्हेर, पूजा नरके यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या प्रसंगी दत्तू नरके, वाय.जी. पवार, सुभाष काळभोर, अरुण झांबरे, कृष्णकांत कोबल, नितीन आरु, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शुभांगी औटी, डॉ. प्रशांत मुळे, प्रा. अनिल जगताप, प्रा. विलास शिंदे आजी माजी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. नितीन लगड व प्रा. डॉ. नाना झगडे यांनी केले तर आभार डॉ. प्रशांत मुळे यांनी मानले.

# भाजपाला १५० जागाही जिंकता येणार नाहीत : संजय राऊत

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी भारतीय जनता पार्टीसह विरोधी पक्षांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. 'इंडिया' आणि 'एनडीए' आघाडीकडून विविध ठिकाणी बैठका घेतल्या जात आहे. संबंधित बैठकीतून लोकसभा निवडणूक जिंकण्यासाठी रणनीती आखली जात आहे. याच पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीची बैठक मुंबईत होणार आहे. यापूर्वी बिहारमधील पाटणा आणि कर्नाटकमधील बंगळुरू येथे विरोधी पक्षाच्या दोन बैठका पार पडल्या आहेत.

या दोन्ही बैठकांमध्ये विरोधी पक्षाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. बंगळुरू येथील बैठकीतून विरोधी पक्षाच्या आघाडीचं नामकरण 'इंडिया' असं करण्यात आलं. यानंतर एनडीएकडूनही बैठका घेण्यात आल्या. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मोठा दावा केला आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपाला १५० च्या वर जागा जिंकता येणार नाहीत. २०२४ मध्ये महाराष्ट्रासह देशात सत्तापरिवर्तन होईल, असं विधान संजय राऊत यांनी केलं. ते मुंबईत प्रसारमाध्यमांशी संवाद साधत होते. यावेळी संजय राऊत म्हणाले, महाविकास आघाडी महाराष्ट्रात लोकसभेच्या ४० हून अधिक जागा जिंकणार आहे, अशी आमची खात्री आहे. लोकभावनाही तशीच आहे.



# राजूर येथे मोरेश्वर विद्यालयात स्वातंत्र्यदिनी मुलींना मोफत सायकलींचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासनाच्या मानव विकास कार्यक्रमांतर्ग इयत्ता आठवी ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना मोफत सायकल वाटप केले जाते.या माध्यमातून शासन स्तरावर जागृती केली जात आहे. यामध्ये शैक्षणिक संस्थाही पुढाकार घेत आहेत.त्याचाच एक भाग म्हणून राजूर येथील मोरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त मोरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा निर्मलताई दानवे यांच्या हस्ते शालेय विद्यार्थिनींना ३८ सायकलीचे वाटप करण्यात आले.

मोरेश्वर विद्यालयात येणाऱ्या विद्यार्थिनी ह्या परिसरातील खेड्यावरून शिक्षणासाठी येतात. वेळवर वाहन उपलब्ध होत नसल्याने मुलींना शाळेत जायला अडचणी येत होत्या. मानव विकास योजना आणि संस्थेच्या पुढाकारातुन शाळेपासून अंतरावर राहणाऱ्या ग्रामीण भागातील ३८ गरजू मुलींना सायकली वाटप करण्यात आल्या.सायकली मिळाल्या बद्दल विद्यार्थी आणि पालकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी हसनाबद पोलीस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक शिवाजी नागवे, शिवाजीथोटे, सुधाकर दानवे, शोभाताई मतकर,सरपंच प्रतिभा भुजंग,उपसरपंच जिजाबाई मगरे, योगीता दानवे,सुशीलाबाई भुजंग,भगवान नागवे, जि.प.सदस्य कैलास पुंगळे, रामेश्वर सोनुने, मा.सभापती भाऊसाहेब काकडे, गणपती संस्थान व्यवस्थापक गणेशराव साबळे,पत्रकार श्यामराव पुंगळे, शिवाजी बोर्डे, श्रीरामपंत पुंगळे, ग्राम पंचायत सदस्य मुसा सौदागर, पंढरीनाथ करपे, संतोष मगरे,परमेश्वर पुंगळे, आप्पासाहेब पुंगळे, गुलाबराव मगरे, विष्णू राज्यकर, रतन ठोंबरे , रामेश्वर टोम्पे, रमेश सोनवणे,लहू शेजुळ ,यादव मोरे मेस्टा अध्यक्ष ज्ञानेश्वर पुंगळे,पंडित पुंगळे, अविनाश थोटे, प्राचार्य संतोष सोनुने, संतोष इंगळे, सुनील दानवे, प्राचार्य किरड आदी च्या हस्ते मुलींना सायकल वाटप करण्यात आल्या.

# भाजयुमो प्रदेश सदस्य व लातूर सहसंपर्क प्रमुखपदी नगरसेवक भास्कर पाटील पवार

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** नगरपरिषदेचे कर्तव्यदक्ष नगरसेवक भास्कर पाटील पवार यांची भाजपा युवा मोर्चा प्रदेश सदस्य व लातूर सह संपर्क प्रमुख पदी नियुक्ती केली असल्याचे नियुक्ती पत्र मुंबईतील भाजपा कार्यालयात दि.( १२ ) ऑगस्ट रोजी देण्यात आले.

लोहा येथील धडाडीचे नेतृत्व म्हणून भास्कर पाटील पवार यांचा उल्लेख केला जातो. भास्कर पाटील पवार हे राजकारणाबरोबरच समाजकारणात अग्रस्थानी असल्याची नोंद आहे. यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन नांदेड लोकसभेचे खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाची मोठी जबाबदारी देण्यात आली. भाजपा कार्यालय मुंबई येथे भाजपा प्रदेश सरचिटणीस व युवा मोर्चा प्रभारी विक्रांत दादा पाटील,प्रदेशाध्यक्ष राहुल भैय्या लोणीकर यांच्या हस्ते भाजपा युवा मोर्चा प्रदेश सदस्य व लातूर सह संपर्क प्रमुख पदी नियुक्ती पत्र देण्यात आली.

यावेळी प्रतिक्रिया देताना लोहा नगरपरिषदेचे कर्तव्यदक्ष नगरसेवक भास्कर पाटील पवार म्हणाले की, अतिशय तळमळीने तन-मन-धनाने एक निष्ठेने भारतीय जनता पार्टीचे काम करत आहे. नांदेड जिल्ह्याचे खंबीर नेते लोकप्रिय खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या माध्यमातून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी , देवेंद्र फडवणीस यांचे विचार मी तळागाळापर्यंत पोहोचण्याचे काम अतिशय तळमळीने केले. केंद्र व राज्य शासनाच्या जनकल्याणाच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतो. याचेच फलित म्हणून मला भारतीय जनता पार्टीच्या युवा मोर्चा प्रदेश सदस्य पदी व लातूर सह संपर्कप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे.



यांच्या नियुक्ती बद्दल लोहा शहर,तालुक्यासह जिल्हाभरातील अनेक लोकप्रतिनिधी भाजपा पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी विविध माध्यमांद्वारे शुभेच्छांचा मोठा वर्षाव होत आहे.

# मी कायम शरद पवारांसोबतच : पाटील

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात उभी फूट पडल्याने पक्षातील अनेक निष्ठावान आणि जुन्या नेत्यांनी अजित पवारांची साथ केली आहे. तर, शरद पवारांकडे अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच सहकारी थांबले आहेत. दरम्यान, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हेही अजित पवार गटाच्या वाटेवर असल्याच्या चर्चा सातत्याने होत असतात. यावरून जयंत पाटलांनी सडेतोड उत्तर दिले आहे. विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात जयंत पाटलांचा सुनिल तटकरेंसोबतचा एक फोटो समाजमाध्यमांवर व्हायरल झाला होता. त्यानंतर, जयंत पाटील अजित पवार गटात जाणार असल्याचीही चर्चा रंगली होती. त्याच काळात जयंत पाटील यांच्या भावाला ईडीची नोटीस आली होती. या सर्व पार्श्वभूमीवर जयंत पाटीलही शरद पवारांची साथ सोडणार असल्याचे सांगण्यात येत होते. परंतु, मी शरद पवारांसोबतच कायम राहणार असून शेवटपर्यंत राष्ट्रवादीची साथ सोडणार नाही, अशी ठाम भूमिका जयंत पाटलांनी घेतली. आजही ते बीड येथे शरद पवारांसोबत दौऱ्यानिमित्त आले असताना पत्रकारांनी त्यांना प्रश्न विचारला. त्यावर जयंत पाटील म्हणाले की, रोज सकाळी उठून बोलणे मला योग्य वाटत नाही. मी माझी भूमिका स्पष्ट केली आहे. देशातील बेरोजगारी, महागाई, मणिपूरचा हिंसाचार या दुर्दैवी घटना घडत आहेत, पण याला महत्त्व नाही. परंतु, जयंत पाटील कुठे जाणार, याला महत्त्व आहे. हे सगळे महत्त्वाचे प्रश्न बाजूला सारण्याचा प्रयत्न कोणी करतंय याचा शोध घ्यावा. मी आहे तिथेच आहे.




# काँग्रेस लागली कामाला

आधुनिक केसरी

लोकसभा निवडणुका अवघ्या काही महिन्यांवर आल्या आहेत. त्यानंतर विधानसभा निवडणुका होतील. या दोन्ही निवडणुकांसाठी काँग्रेस पक्ष आतापासूनच तयारीला लागला आहे. लोकसभेच्या ४८ जागा व विधानसभेच्या सर्व मतदारसंघात काँग्रेसचे संघटन, सेल, विभाग, फ्रंटल ऑर्गनाझेशन, या सर्व घटकांनी पूर्ण ताकदीने काम करावे. प्रत्येक जागा जिंकण्याचा निर्धार करूनच कामाला लागा, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे विविध विभाग, सेल, आघाडी व संघटनांचे अध्यक्ष व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष यांची संयुक्त बैठक टिळक भवन येथे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, समाजातील सर्व जाती, धर्माचे घटक व व्यवसायिकांना काँग्रेस पक्षाशी जोडण्यासाठी ३९ सेल स्थापन केले आहेत. हे सर्व सेल तसेच युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, एनएसयुआय, सर्व फ्रंटल ऑर्गनायझेशन आगामी निवडणुकीत पूर्ण ताकदीने काम करतील. काँग्रेस पक्षाचा जनाधार वाढत आहे, लोकांचा काँग्रेसवरचा विश्वास आणखी दृढ होत आहे, जनतेला परिवर्तन हवे आहे. जनतेपर्यंत पोहचा व काँग्रेसला विजयी करण्याचा निर्धार करून काम करा. भाजपाच्या कारभाराला जनता कंटाळलेली आहे, भ्रष्ट, अन्यायी, अत्याचारी भाजपा सरकारला सत्तेतून उखडून टाकणे हेच काँग्रेसचे मुख्य ध्येय आहे. पत्रकाराचा प्रश्नाला उत्तर देताना पटोले म्हणाले की, सरकारच्या विरोधात बोलणाऱ्यावर कारवाई करुन त्याचा आवाज दडपण्याचे काम भाजपा करत आहे. नागपूरचे वकील सतीश उके यांना मकोका लावण्याचे काहीच कारण नाही. परंतु सत्तेचा दुरुपयोग सुरु असून त्याच भूमिकेतून ही कारवाई करण्यात आलेली आहे. सतिश उके यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक आयोगाला दिलेल्या प्रतित्रापत्रात काही महत्वाची माहिती दिली नाही अशी तक्रार केलेली आहे, यावरून त्यांच्यावर खोटे आरोप लावून मकोका लावण्यात आला आहे. हा सत्तेचा माज असून जनता भाजपाचा सत्तेचा हा माज उतरवेल. टिळक भवन येथे पार पडलेल्या बैठकीला माजी मंत्री व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, चंद्रकांत हंडोरे, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष आ. वजाहत मिर्झा, आ. सुरेश वरपुडकर, आ. अभिजित वंजारी, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश उपाध्यक्ष भा. ई. नगराळे, एस. सी. विभागाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबीरे, प्रदेश सरचिटणीस राजन भोसले, राजेश शर्मा, प्रवक्ते डॉ. राजू वाघमारे आदी उपस्थित होते.

# सरस्वतीच्या ज्ञानमंदिरात बडव्यांचा उच्छाद



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**एखादा नविन कांहीतरी औत्सुक्याचा अथवा कुतूहलाचा विषय असला, दिसला व बघितला की सर्वजण त्याकडे आकर्षित होतात. पण एखादा तोच तोच विषय पुन्हा पुन्हा ऐरणीवर आला व जुना झाला किंवा वारंवार त्याकडे बघितले कि सर्वजण त्याला दुर्लक्षीत करतात. तसे औत्सुक्य व कुतूहल वाढविणारे असंख्य विषय आपण रोजच वेगवेगळ्या प्रसिद्धी माध्यमांद्वारे बघत आहोत. आजच्या लेखाचा मुख्य विषय आहे 'भ्रष्टाचार'. आपल्या देशात विविध क्षेत्रात मग ते राजकीय असो, सामाजिक किंवा वैयक्तिक. तसे भ्रष्टाचार या विषया बाबत सर्वच प्रसिद्धी माध्यमे रोज कुठल्या न कुठल्या गोष्टींबाबत या विषयावर भाष्य करून आपआपले मत प्रदर्शीत करतात पण कुणीही त्याला प्रखरतेने समाजासमोर ठेवून तो समूळ नष्ट करण्याचा परिपूर्ण प्रयत्न करत नाही.**

'रोजचे मढे अन् त्याला कोण रडे' या वाक्यप्रचाराप्रमाणे कुणीही या विषयाच्या मुळापर्यंत जाऊन शासन, प्रशासन समाज व देशाला कायमस्वरूपी लागलेली ही कीड घालविण्यासाठी प्रामाणिक व पारदर्शीपणे प्रयत्न करत नाहीत. अनावधानाने जर असा प्रयत्न झालाच तरी कालांतराने हे भ्रष्टाचाराचे स्वरूप नष्ट करण्याची इच्छाशक्ती अथवा प्रयत्न कुठल्याही कायदेशीर शासन किंवा प्रशासकीय यंत्रणेमार्फत त्वरीत होत नसल्यामुळे 'भ्रष्टाचार' या विषयाबद्दल कुठलीही यंत्रणा फारसे गांर्भियाने किंवा कडकपणे घेऊन कार्यवाही करीत नाहीत त्यामूळे सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात आहे. कायद्यात कुठेही पुरेश्या साक्षी पुराव्यांशीवाय याचा समूळ नाश करण्याची तरतूद नसल्यामूळे भ्रष्टाचार करणारी जमात सैराटासारखी वागत आहे.

या विषयाबाबत प्रामाणिक निपःक्षपातीपणे चौकशी करणारी सक्षम यंत्रणा नसल्यामूळे व वेळकाढू धोरणामूळे भ्रष्टाचार करणाऱ्या जमातीला राजमान्यता असल्यासारखे रानमोकळे झालेले आहे. कायदा अथवा तपासयंत्रणेची कुठलीही भिती या वर्गाला उरलेली नाही. 'तू केलास, तुझं झाकल्या गेलं, तू निर्दोश सुटलास' या अहंकारी भावनेतून कुणीच कुणाचे वाकडे करू शकत नाही असा सर्वदूर दृढनिश्चय झालेला आहे. जर अशा वर्गाला तात्काळ कठोरातील कठोर शिक्षा झाली तर परत कुणी असे कृत्य करण्यास धजणार नाही. भारतीय संविधान व कायद्यानूसार अशा प्रकारात इन्स्टंट कार्यवाही करण्याची कुठेही तरतूद नाही. ही झाली भ्रष्टाचार बंदोबस्ताची माझी वैचारीक मांडणी.

विषय स्पष्टीकरणाकडे वळत असताना सर्वत्र मोठ्या प्रमाणात होत असलेल्या भ्रष्टाचाराचे स्वरूप बघून मन सुन्न होते. पण मित्रहो, विशेषत्वाने शिक्षक व वैद्यकीय क्षेत्रातील वर्तमान भ्रष्टाचाराचे स्वरूप पाहून तर मन अधिकच उद्वीग्न होते. शेवटी एकटा करणार तरी काय ? पण एकटा म्हणून अशा विषयावर भाष्य करणे किंवा लेखणी चालवणे सोडून चालणार नाही. मला सरस्वतीच्या आर्शीवादाने असे विषय ऐरणीवर आणले पाहिजेत असे वाटते, जेणे करून कुणीतरी प्रामाणिक वाचक या विषयाला जन आंदोलनाचे स्वरूप देऊन काम करण्याचे धाडस करतील हाच एकमेव उद्देश. "सरस्वतीच्या ज्ञानमंदिरात बडव्यांचा उच्छाद" हे शिर्षक या लेखासाठी मी मुद्दामच निवडले आहे. कुणीही गैरसमज करू घऊ नये. सर्वसामान्यांना व मलाही असे वाटते कमीत कमी देवाच्या दारात जाऊन देवापुढे नतमस्तक होण्या ऐवजी तेथे जाऊन जर जनावराप्रमाणे उच्छाद मांडून देवाचे देवत्वच नाहीसे करायचे तर अशा विकृत व्रत्तीला माणूस म्हणून संबोधावे काय ? शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षकांसाठी ही गोष्ट केवळ लाजीरवाणी नसून अतिशय घ्रणास्पद आहे. विद्यादान व विद्यार्जन ही दोन्ही क्षेत्र व्यक्ती, समाज व देश




घडवीण्यासाठी तसेच व्यक्तीपरत्वे त्याच्या जडणघडणीत अतिशय मोलाचे असून येथे सुसंस्कारीत, प्रामाणिक, स्वाभिमानी व कष्टाळू पिढी रहावी म्हणून आपल्या पूर्वजांनी ज्ञानदान करून चांगले सुसंस्कारीत कुटूंब, समाज व देश घडवला ही त्यामागची मोठी वैचारीक दृढता होती, जी आज शिक्षणासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात दिवसेंदिवस नष्ट होत चालली आहे. ही विनाशाची नांदी होय.

मागच्या कैक दिवसापासून सर्वच मिडीयाने वर्तमान शिक्षणक्षेत्रातील भ्रष्टाचाराबाबत प्रखरपणे विचार मांडून शिक्षण क्षेत्राचे वाभाढे काढले आहे. महाराष्ट्रात शासन अनुदानित खाजगी ६६१ तर एकट्या मुंबई प्रदेशात ३४७ शाळा बोगस असून शिवाय १६० मदरशांची ही त्यात भर आहे. केवळ शासनाचे कोटयावधी नव्हे तर अब्जावधी रुपयांचे बोगस अनुदान लाटून ही मंडळी त्याचा पुरेपूर फायदा घेत आहेत. त्यामूळे जनतेच्या व पर्यायाने शासनाच्या तिजोरीवर ही शिक्षण संस्थाचालक मंडळी नुसते चोऱ्या कारण्याचेच काम नव्हे तर डाके घालण्याचे काम करीत आहेत. अशा मंडळीना शिक्षणसम्राट, साखरसम्राट, कर्मयोगी, कर्मवीर अशा उपाध्या देऊन सन्मानीत केले जाते. त्यागा ऐवजी पैशाच्या फुटपट्टीवर यांचे मोजमाप होऊन यांना सन्मानीत केले जाते हे नैसर्गिक न्यायाशी सुसंगत आहे काय ? शासन व प्रशासनकर्ती जमात याचा खऱ्या अर्थाने केव्हा विचार करणार ? वरील आकडेवाडीत महाविद्यालयांचा समावेश नाही. महाविद्यायीन कारनाम्यांचा इतिहास तर कांही औरच आहे.

अशा सर्व व्यवस्थेत शिक्षण क्षेत्रातील ही सर्व टोळीबाज मंडळी बोगसपटसंख्या दाखवून शासनाची तिजोरी रिकामी करून सर्व सामांन्याला वेठीस धरीत आहेत. शिक्षणक्षेत्रात विशेषतः अनुदानित अथवा शासनमान्य महापालिका-नगरपालीका व जिल्हा परिषदेतील ज्ञानदान करणारी शिक्षणमंडळी पगार व इतर बोगस भत्यापोटी कोट्यावधी रूपये शासनाकडून घेतात याला कुठेच कायेदशिर पायबंद नाही. मागच्या वर्षभरापूर्वी मराठवाड्यात मुख्यालयाला हजर न राहता शिक्षकांनी उचललेला बोगस घरभाडे भत्ताप्रकरण न्याय प्रविष्ट आहे. तदनंतर प्रश्न पुढे येतो तो वर्तमानातील शिक्षक मंडळीच्या गुणवत्ता तापसणीचा. परवाच संभाजी नगर येथे शिक्षकांच्या गुणवत्ता तपासणीसाठी बोलावण्यात आलेल्या एकंदर शिक्षक मंडळींपैकी अगदी नगण्य प्रमाणत यांची उपस्थिती होती. वर्तमानातील शिक्षकांच्या गुणवत्तेबद्दल तर न बोलणेच बरे. यांची गुणवत्ता तपासण्यासाठी जर ब्रह्मदेवाला बोलावले तर तो देखील यांच्यापुढे नतमस्तक होईल अशी यांची प्रामाणिक गुणवत्ता आहे. गुणवत्ते बाबत या क्षेत्रात अपवादाने कांही चांगली मंडळीही आहेत. पण बहुतांशजणांकडे प्रकर्षाने गुणवत्तेचा अभाव दिसतो. शिक्षण क्षेत्रातील अशा बेजबाबदार व बेईमानवृत्तीमूळे या क्षेत्राचे पूर्णतया वाटोळे झालेले आहे. महाराष्ट्रात खेडयापासून ते राज्याच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात खाजगी शिकवणी वर्ग उदयास अल्यामूळे पालक व विद्यार्थी वर्गाकडून अव्वाच्या सव्वा भरमसाट शुल्क आकारणी करून विद्यार्थी व पालकांना नागवे केले जात आहे. येथे आयकर विभाग थातूरमातूर कार्यवाही करून आपले उखळ मात्र पांढरे करून घेतात.

एकंदरीतच शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराची ही बजबपुरी केव्हा थांबणार असे सर्वसामान्याला वाटत आहे. का फक्त शासन व प्रशानामार्फत नुसत्या वर्षानुवर्षे चौकश्या करतो म्हणून जनतेच्या पैशाची उधळपट्टी करणार हे शासन व प्रशासनकर्त्यांनी ठामपणे सांगावे. जनसामान्यांच्या मते अशा भ्रष्टाचाराबाबत नुसत्या चौकश्या नकोत तर अशी सर्व प्रकरणे ED अथवा NIA मार्फत तपासणी करून या सर्व भामट्यांच्या मुसक्या आवळून यांना फासावर चढवीले पाहिजे असे सर्वमतावरून दिसते. पण असे होणे शक्य नाही, जनतेसह पालक-विद्यार्थीवर्ग-शासन-प्रशासनाला याची अजिबात खंत अथवा खेद वाटतो का नाही हा फार मोठा विचाराजोगा प्रश्न आहे. म्हणून म्हणावेसे वाटते अरे शिक्षणक्षेत्रातील बेईमान गद्दारांनी कमीत कमी सरस्वतीच्या ज्ञानमंदिरात तरी असे दुष्कृत्य करू नयेत. असे जनमनाच्या कानोस्यावरून स्पष्ट होते. शासन व प्रशासनाने शिक्षण क्षेत्रातील बाजारीकरण त्वरित बंद करावे .

**बरबादे चमनके वासते बस एक ही उल्लू काफी है ।**
**यहाँ तो हर शाख पे उल्लू खडे है, अंजामें गुलिस्ताँ क्या होगा** ।। जय हिन्द । इन्कलाब जिंदाबाद । लाल सलाम

# जीवनविद्या समजली नाही तर मग सगळं निष्फळ



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**योग्य फल निष्पत्ती होण्यासाठी जीवन विद्या हि समजणं गरजेच आहे.जीवन विद्या हि आत्मज्ञानाशी निगडित असते . आत्मज्ञान अवगवत होणं म्हणजेच जीवन विद्या अर्जित होणं .जगातील सगळ वैभव ऐश्वर्या असताना देखिल अशांती आणि अस्थिरता निर्माण होत असेल तर मग आपल्याकडं जीवन विद्या नाही. एंकदरीत गरीब श्रीमंत कोणीही मग तो असो ज्यांच्या जीवनात अस्थिरता, अशांती आहे त्यांनी जीवन विद्या अर्जित केलेली नाही अथवा त्या मार्गाने मार्गस्थ नाहीत.**

जीवनाचा मतीत अर्थ समजला पाहिजे.मतीत अर्थ समजला तर जीवन हितार्थ लागत आयुष्याचा सार्थक उदेश सार्थकी लागण्यासाठी अथवा योग्य पद्धतीने आयुष्य पुर्ण करण्यासाठी जे काही ज्ञान तत्वज्ञान कामी पडत उपयोगी ठरत ते ज्ञान , तत्वज्ञान म्हणजे जीवन विद्या. जीवनाला पुर्णतः मिळावी हाच मुख्यत्वे प्रत्येकाचा जीवन हेतु असतो. परंतु आपल्या जन्माचा हेतु आपल्याला महित नसल्या कारणाने आपण जीवना विषयी संभ्रमित असतो आणि त्यामुळे स्वतःवर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी अनेक अडचणी निर्माण होतात. स्वतःवर नियंत्रण प्रस्थापित करून यशस्वी जीवन मार्ग पूर्ण करण्याची विद्या हि जीवनात शिकावी लागते .आणि हि विद्या कोणत्याही शाळेत विद्यालयात महाविद्यालयात शिकायला मिळतं नाहीतर ती अर्जित करावी लागते . त्यासाठी शिक्षण असलं काय आणि नसल काय तरी चालत.जीवन विद्या समजली तर मग मात्र सगळ शिक्षण उपयोगी ठरत शिक्षण कारणी लागतं. अन्यथा आपण कितीही शिकलो आणि जीवन विद्या समजली नाही तर सगळं शिक्षण व्यर्थ आहे अथवा निरर्थक ठरत. शिक्षण उच्चशिक्षण या पुढे जीवन शिक्षण असतं. ज्याला आपण जीवन विद्या संबोधतो जीवन विद्या अर्जित करण्यासाठी आपण शिक्षित असलच पाहिजे असं नाही. जीवन शिक्षण समजणं हेच जीवनातील हितार्थ आहे. लाखो करोडो रुपये खात्यावर जमा त्याच बरोबर जगातील सगळ्या सुख सुविधा उपलब्ध असणारी माणसं देखिल क्षणात जगाचा निरोप घेतात हे निश्चित भयानक आहे.पण असं का घडतंय ते महत्वाचं आहे. आपण नेमकं काय शिकतोय अथवा काय शिकलो आहेत याचा विचार आपण कधीच करत नाही. शिक्षण कुठेही घ्या फार काही फरक पडत नाही .पण जीवनदायी विद्या समजली पाहिजे. आणि हि विद्या समजली नाही तर मग मात्र सगळ्या घडामोडी प्रयत्न निष्फळ निरर्थक



आहेत. जीवनात काय मिळवलं किती मिळवलं या पेक्षाही समाधान कारक रित्या जीवन पूर्ण कसं करता येईल या साठी महत्वाची विद्या जीवन विद्या समजली का ? अथवा अर्जित करता आली का ? हेच अंतिमतः महत्वपूर्ण आहे. अन्यथा करोड रूपया सह सर्व सुख सुविधा असणारी व्यक्ती स्वतःला क्षणात संपवुन कशी घेईल. मग असं का ?होत का ?घडत अथवा सगळं काही ऐश्वर्या असणारी माणसं क्षणात नैराश्याच्या गर्तेत सापडतात. अथवा तणाव कमी व्हावा म्हणून वेगवेगळ्या प्रकारच्या नशेच्या धुंदीत झिंगाट होतात अथवा स्वतःला नशेच गुलाम बनवतात.आपण भौतिक सुख सुविधा ज्या ज्या बाबीना संबोधतो त्या सर्व बाबी असताना देखिल जीवन अशांत अस्थिर असेल तर मग नेमकं कमी काय आहे तर जीवन विद्या कमी पडली नैसर्गिक रित्या या जगाचा निरोप स्वीकारणं अगदी क्रमप्राप्त आहे. त्या मध्ये कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही प्रकारची सवलत कोणालाही मिळत नाही त्याची अपेक्षा करण पण गैर आहे पण स्वतःहून या जगाचा निरोप घेण्याच्या दिशेने मार्गक्रमण करण म्हणजे हे शिक्षण मग कोणतं आहे आणि ते हितार्थ आहे का ? तर निश्चितच ते हितार्थ नाही.जीवन उदेश समजला पाहिजे.आपण उगाच काही काम नाही म्हणून जन्म घेतला नाही त्याच प्रयोजन काय आहे हे खुप महत्वाच आहे. जीवनाचं प्रयोजन समजल कि मग जीवन विद्या आपोआप समजते आणि जीवन विद्या समजली कि आपली दृष्टी आणि दृष्टीकोन आपोआप बदलतो. आणि जीवनाविषयी सकारात्मक ऊर्जे निर्माण होऊन वैचारिक प्रगल्भता प्रचंड मोठ्या प्रमाणात वृद्धिंगत होते जेणेकरून आपल्या जीवनात कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होत नाही अथवा तणावाचा प्रवेश होत नाही.जीवन विद्या हेच जीवनातील खर आणि शाश्वत वैभव आहे हे वैभव आपल्याला अर्जित करता आलं पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# एक संघ लढ्यातून काँग्रेस 'क्रांतिभूमीत' तिरंगा फडकवणार

## विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार : शहिदांना श्रद्धांजली

आधुनिक केसरी न्यूज

**चिमूर क्रांतीचा इतिहास अजरामर** : आज 16 आगस्ट चिमूर क्रांती दिनी महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्ष नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी चिमूर येथील हुतात्मा स्मारक येथे येऊन चिमूर क्रांतीतील शहिदांना श्रद्धांजली अर्पण केली . यावेळी बोलतांना विरोधी पक्षनेते आ . सेवडेट्टीवार म्हणाले की सन 1942 साली देशातील चिमुरात क्रांतीची पहिली ठिणगी पेटली . यात शहीद वीर क्रांतिकारक बालाजी रायपूरकर व त्यांच्या साथीदारांनी हाती शस्त्र नसताना देखील शस्त्रधारी इंग्रज अधिकाऱ्यांशी लढा दिला . या लढ्यात अनेक तरुणांना वीरमरण आले . हा चिमुरचा क्रांतिकारी इतिहास स्वातंत्र्याच्या लढाईच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिल्या गेला असून तो सदैव अजरामर राहील . असे प्रतिपादन राज्याचे विरोधी पक्ष नेते आमदार वडेट्टीवार यांनी केले .

**चंद्रपूर** : 16 ऑगस्ट हा देशाच्या स्वातंत्र्याच्या इतिहासाला कलाटणी देणारा दिवस आहे. महात्मा गांधींनी इंग्रजांना चले जावचा नारा दिल्यानंतर संपूर्ण देशात "करो या मरो' अशी परिस्थिती निर्माण होऊन स्वातंत्र्याच्या मोठया उठावास सुरुवात झाली. याच काळात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या क्रांतिकारक भजनाने प्रेरित होऊन 1942 साली चिमुरात क्रांतीची मशाल हाती घेऊन येथील वीरांनी प्राणाची आहुती देत चिमूरला सर्वप्रथम स्वातंत्र्य मिळवून दिले. हा इतिहास देशाच्या स्वातंत्र्याच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिल्या गेला. सलग दहा वर्षे या क्रांती भूमीची आमदार म्हणून सेवा करण्या करिता मिळालेल्या सेवा संधीमुळे या मातीशी माझी नाळ जुळली आहे. येथील वीर शहिदांना अभिवादन करण्यासाठी मला कोणीही रोखू शकत नाही. सोबतच संपूर्ण काँग्रेस एक संघ होऊन या क्रांती भूमी तिरंगा फडकविणार असे प्रतिपादन राज्याचे विरोधी पक्षनेते आ.विजय वडेट्टीवार यांनी केले. ते चिमूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी प्रामुख्याने माजी आमदार, प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी आदिवासी विभाग डॉ .नामदेव उसेंडी, चिमूर गडचिरोली लोकसभा क्षेत्र निरीक्षक, डॉ.नामदेव किरसान, महासचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी डॉ. अविनाश वारजूकर, प्रदेश संघटक महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभाग, धनराज मुंगले, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. सतिष वारजूकर, जिल्हा काँग्रेस महासचिव गजानन बुटके, राम राऊत, संजय डोंगरे, काँग्रेस अनुसूचित जाती सेलचे प्रफुल खापर्डे, तालुका अध्यक्ष विजय गावंडे, प्रमोद चौधरी, संदीप कावरे , कृष्णा तपासे , राजू लोणारे माधव बाबू बिरजे, उमेश हिंगे,कल्पना इंदुरकर , रीता अंबाडे मंचावर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, आर एस एस सारख्या मनुस्मृति विचारांच्या शक्तीने देशाच्या राष्ट्रध्वजाचे महत्व कमी करण्याचा प्रकार सुरू आहे. एकीकडे देशाचे पंतप्रधान राष्ट्रध्वज फडकवीत असताना दुसरीकडे मात्र देशद्रोही मनोहर भिडे सारख्या कडून तिरंगा ऐवजी दुसरा ध्वज फडकवा असा समाजात तेढ निर्माण करणारा विषारी संदेश पसरविल्या जात आहे. देशाला जीवन समर्पित करून बलिदान देणाऱ्या महापुरुषांचा अवमान करणाऱ्या या देशद्रोही भिडेला तुरुंगात डांबण्या ऐवजी गुरुजी म्हणून सत्ताधारी विद्यार्थी सन्मान करीत आहेत. महात्मा गांधींच्या विचारांची महानता या मनुस्मृति वाद्यांना काय कळणार ? असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला. तर देशात पंतप्रधान मोदींनी हुकुमशाही धोरण लावण्यासाठी स्वायत संस्थांचा वापर करून पक्ष फोडाफोडींचे राजकारण सुरू केले आहे. राजकारणासाठी देवांच्या नावांचा वापर करून समाजाला जाती जातीत विभागले जात आहे यामुळे देशाची एकात्मता धोक्यात आली असून 2024 ची स्वातंत्र्याची दुसरी लढाई साठी सर्वांनी सज्ज राहून राहुल गांधी यांना पंतप्रधान करण्यासाठी करावी, असेही विरोधी पक्ष नेते आ.वडेट्टीवार प्रतिपादन यांनी केले.

# नापिकीला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज



**चारठाणा** : येथील शेतीची सतत ची नापिकी, आर्थिक भार, डोक्यावरील असलेले कर्ज तसेच गेल्या १५ते २०दिवसापासुन पावसाने दिलेली उघडीप त्यामुळेच होणारी खरीप हंगामातील पिकांचे होणारे मोठे नुकसान पाहून ते निराश झाले होते.

या त्रासाला कंटाळून येथील प्रगतशील शेतकरी गणेश नागनाथआप्पा क्षीरसागर( ४० )वर्षे यांनी दि.१६ बुधवार रोजीच्या रात्री ११:३०वाजता शेतात आखाड्यावर जातोय व सकाळी दुध घेऊन येतोय म्हणून घरुन निघुन गेले आसता सकाळ झाली तरी आपले पती घरी आले नाहीत हे पाहण्यास याच्या लहान मुलगा प्रथमेश गणेश क्षिरसागर हा शेतात गेला आसता यास आपले वडील लिंबाच्या झाडाला फाशी घेऊन लटकलेले पाहीले आसता यांनी घरी कळवले .आपल्या स्वतःच्याच शेतात जाऊन लिंबाच्या झाडाला स्वतःच गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आल्यानंतर याच्या नातेवाईकांनी शेतात धाव घेतली नातेवाईकांच्या माहीतीवरुन येथील पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी गायकवाड व सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विनोद साने ,पो.कॉ.पवन राऊत, जिलानी शेख यानी घटनास्थळी जाऊन घटनेचा पंचनामा करून चारठाणा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृतदेह जिंतूर येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन करुन शव क्षिरसागर कुटुंबाच्या स्वाधीन करण्यात आले ,याच्या पार्थिवावर गुरुवार रोजी दुपारी १:३०वाजता येथील परिसरातील सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आला.

# माझी शेती माझा सातबारा मीच नोंदवणार माझा पीक पेरा

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद** : महसुल विभाग व कृषी विभाग यांच्या वतीने 1 आगस्ट पासुन संयुक्तपने ई - पिक पाहणी प्रकल्प राबविण्यात येत आहे त्या अनुषगाने बाजार सावंगी येथे शेतकरी यांच्या बांधावर जाऊन ई - पिक पाहणी बाबत माहिती देण्यात आली.

मा.उपविभागीय अधिकारी संतोष गोरड व मा.तहसिलदार स्वरूप कंकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली माझी शेती,माझा सातबारा मीच नोदवणार माझा पिक पेरा बाजार सावगी येथील शेतकरी रावसाहेब विश्वनाथ नलावडे यांच्या गट न 778 बांधावर जाऊन तलाठी नारायण पठ्ठे यांनी ई - पीक एप प्ले स्टोअरवर जाऊन डाऊनलोड करावी . ई - पीक पाहणी कशी करावी त्याबाबत प्रशिक्षण व माहिती दिली मोबाईल ऍपद्वारे शेतकरी यांना शेतात पेरणी केलेल्या पिकाची नोंद ही आता स्वतः घेता येणार आहे शासनाच्या निर्देशाप्रमाणे आपली ई पीक पाहणी 2.0 व्हर्जन ॲप प्ले स्टोअर मध्ये डाऊनलोड करून आपल्या मोबाईल द्वारे आपण प्रत्यक्ष शेतामध्ये जाऊन आपली पिक पाहणी नोंद करावयाची आहे. आपल्याला याचा फायदा पिक विमा, नैसर्गिक आपत्तीमध्ये पिकांचे नुकसान झाल्यास, तसेच बँक कर्ज व इतर पिकाच्या अनुषंगाने शासकीय योजनेचा फायदा होणार आहे. त्यामुळे आजच आपली ई पिक पाहणीची नोंद तातडीने प्रथम करून घ्यावे असे आवाहन सर्व शेतकरी यांना तलाठी नारायण पठ्ठे यांनी केले त्यावेळी ग्रामसेवक आसाराम बनसोड सरपंच आप्पाराव नलावडे,पोलिस पाटील कारभारी नरवडे, पोपट काटकर, शेकु आसाराम जाधव, संतोष नलावडे, प्रकाश दांडगे, पुंजाजी नलावडे, संजय नलावडे,गणेश गायकवाड, इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

अर्जंट पाहिजेत
बँक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वतःची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958

CAFÉ ROCKSTARZ EAT . CHILL . REPEAT
11:11 ELEVEN ELEVEN
Where Dishes come true..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928

# 'पक्षी दूर देशी गेलं' ना.धों. महानोरांना काव्यमय आदरांजली..!

## || मंथनाचे पैलू ||




डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : २८

ज्येष्ठ कवी, गीतकार पद्मश्री ना.धों. महानोर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ... "पक्षी दूर देशी गेलं " या सुंदर शीर्षकांतर्गत कविवर्य ना.धों.महानोर यांना काव्यरुपी आदरांजली अर्पण करण्याचा कार्यक्रम १५ ऑगस्ट २०२३ मंगळवार रोजी सायंकाळी ६:३० वाजता छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद ) येथील एम.जी.एम. कॅम्पसच्या "रुक्मिणी सभागृहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्‌घाटक म्हणून यशवंतराव चव्हाण सेंटरचे अध्यक्ष तथा खासदार पद्मविभूषण मा.शरदचंद्रजी पवार साहेब यांची उपस्थिती असल्याने सभागृहात प्रचंड गर्दी होती...कवी महानोरांच्या कवितेचे दर्दीही तितकेच होते. कविश्रेष्ठ ना.धो.महानोर आणि मा.शरदचंद्रजी पवार साहेब यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा स्नेह असल्याने मा.पवार साहेब ह्या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहिले. ह्या कार्यक्रमाचे आयोजन यशवंतराव चव्हाण सेंटर, एम.जी. एम.विद्यापीठ, मराठी विभाग डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, मराठवाडा साहित्य परिषद, मराठवाडा आर्ट, कल्चर अँड फिल्म फाऊंडेशन आणि अभ्युदय फाऊंडेशन अशा विविध संस्था व मराठीभाषा प्रेमी मान्यवरांनी केले होते. आमचे स्नेही, डॉ. बा.आं.मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रा. डॉ.कैलासजी अंभुरे सर यांनी फेसबुकवर पत्रिका टाकून सर्वांना निमंत्रित केले होतेच. या पत्रिकेमुळे अनेक मराठी काव्यप्रेमींना व कवी ना.धो.महानोर प्रेमींना या सुंदर कार्यक्रमाचा आस्वाद घेता आला.

कविवर्य ना.धो.महानोरांच्या कवितेनेच त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा हा आगळा वेगळा कार्यक्रम काव्यरसिकांना पहावयास व ऐकावयास मिळाला, ही संभाजीनगरच्या रसिकांसाठी सुंदर पर्वणी होती. मी औरंगाबाद येथेच एका पुरस्कार वितरण सोहळ्याच्या कार्यक्रमात अडकल्यामुळे मला ह्या कार्यक्रमास उपस्थित राहता आले नाही; याची खंत आहेच; परंतु माझे साहित्यिक मित्र सुदाम मगर यांनी मला हा सुरु असलेला कार्यक्रम फोनवर बराचवेळ ऐकवला. नंतर मी प्रवासात असल्यामुळे तितकासा स्पष्ट ऐकता आला नाही ; परंतु दुसऱ्या दिवशी या कार्यक्रमाचे निवेदनसूत्र ज्यांचेकडे होते ते कलावंतस्नेही जे नुकतेच कलारत्न पुरस्काराने सन्मानित झाले आहेत असे कॉम्रेड प्रा.डॉ.समाधान इंगळे सर यांच्या फेसबुक वॉलवरून काही छायाचित्रे व चित्रिकरणातून चित्रित झालेला काही संवाद ऐकला. या कार्यक्रमाचा सारांश व कविवर्य महानोर यांच्या कवितेविषयी मला जे वाटलं ते नोंदवलं आहे. कविवर्य महानोरांच्या एकूण कवितांचा किंवा त्यांच्या एकूण साहित्य प्रवासाचा आलेख शंभर-पन्नास ओळीच्या लेखातून मांडता येणे कसे शक्य आहे ? आदरांजलीच्या निमित्ताने फक्त काही नोंदींचा हा लेखनप्रपंच आहे.

ज्यादिवशी कविवर्य ना.धों.महानोर गेल्याची फेसबुकवर पोस्ट वाचली तसं काळजात धस्स झालं, मन अस्वस्थ झालं. एका कवीला महाराष्ट्राने गमावलं असल्याची भीती, चिंता आणि चिंतनाचं त्रिवेणी मिश्रण होणं सुरू झालं. नैसर्गिक आपत्तीपुढे मानवाला हारच मानावी लागते हे मात्र त्रिवार खरं आहे.


कवी किंवा कलावंत हे त्या त्या काळाचं अपत्य असतात ते त्या राज्यातील लोकांनी राज्यकर्त्यांनी त्यांना जपलं पाहिजे. कलावंतांना जपणारी माणसं आता बोटावर मोजण्याइतकी शिल्लक आहेत. कलावंत हा आपल्या राज्याचं वैभव असतो असं ज्यांना वाटतं तेच कलावंतांची कदर करतात. महाराष्ट्रभूमीने या देशाला अनेक कलावंत देऊन देशाच्या सांस्कृतिक वैभवात मानाचा तुरा खोवला आहे. काही ठराविक माणसांचा जन्म केवळ एखाद्या कार्यासाठीच झालेला असतो म्हणून त्यांच्या अंगी निसर्गाने बहाल केलेले ते उपजत कलागुण असतात.

एका हॉटेलमध्ये चहा घेत असतांना आमचे मित्र के.टी.उपदेशे म्हणाले कवी महानोर हे केवळ कवितेसाठीच जन्माला आलेले कवी होते, ते सहज बोलले आणि ते मान्यही करावं लागलं. कवी ग्रेस, ना.घ.देशपांडे, वसंत बापट, मंगेश पाडगावकर, जगदीश खेबुडकर, भा.रा. तांबे, बहिणाबाई चौधरी, बा.भ.बोरकर, ग.दि. माडगुळकर, फ.मु. शिंदे, ना.धो. महानोर अशी अनेक नावे सांगता येतील. अशा कितीतरी कवींनी केवळ कवितेसाठीच जन्म घेतला होता, किंवा घेतला आहे असं वाटतं. कारण या महान कवींच्या कवितांनी इथले काव्यविश्व समृद्ध केलं आहे.

कविवर्य महानोरांनी मराठी रसिकांच्या मनोरंजनासाठी एकापेक्षा एक सरस अशी गीते दिली. भावगीते दिली, लावण्या दिल्या. त्यांच्या शब्दमाधुर्याने रसिकांच्या मनावर गारूड केलं आहे, हे "पक्षी दूर देशी गेलं" या भावस्पर्शी संगीतमय आदरांजली कार्यक्रमाच्या निमित्ताने जमलेल्या दर्दीच्या उपस्थितीने लक्षात आले.

कवी महानोर म्हणजे 'हिरव्या रानाला पडलेलं एक सुंदर स्वप्न होतं' असं वाटू लागले. रानाची, रानातल्या पानाची हिरवी बोली बोलणारा कवी काळाने हिरावून नेला, हिरव्या बोलीचा शब्द मुका झाला.. जे महानोरांना अंत्यदर्शनासाठी गेले त्यांना त्या शिवाराच्या अनावर हुंदक्यानं सांगितलं असेलच... "ना.धों.महानोर नावाचं हिरव्या रानाला पडलेलं ते एक स्वप्न होतं." पळसखेड्यातील हिरवे रान ह्या हळव्या, संवेदनशील कविला मुकले. तसे मराठी साहित्यविश्वही या रानकवीला मुकले आहे. कवी महानोर हे मराठी साहित्यविश्वाची कवितेनं ओटी भरून गेले. त्यांचे मराठी काव्यविश्वाला मोलाचे योगदान लाभले आहे, हे मराठी माणूस कधीच विसरू शकणार नाही.

शेतीमातीशी आपले नाते घट्ट करून तिचे सौंदर्य आयुष्यभर शब्दात मांडणारा



सृजनशील रानकवी आता कायमचा प्रवासाला निघून गेला आहे, तो पुन्हा कधीच परत न येण्यासाठी... आता महाराष्ट्र या कवीला मुकला आहे. पळसखेड्यातील जीव लावलेले रान या कवीला मुकले आहे. आता हिरव्या निसर्गाच्या, प्रिती प्रेमाच्या... प्रतिमा, प्रतिकांना सहज सुंदर,तरल, वेल्हाळ शब्दांत गुंफणाऱ्या सकवार कवीच्या आठवणी केवळ काव्यातून,गीतातून जागवाव्या लागतील.. आज उदास उदास दूर पांगल्या साऊल्या

कवी महानोरांच्या पळखेड्यातील रानात घुमणारी गोड शब्दांची धून कायमची शांत झाली. कवी महानोरांचा प्राण पळसखेड्यातील रानात विसावला. या रानाला लळा लावलेल्या मातीचा कण न् कण.. वृक्ष वेलींचे पान न् पान आता महानोर दिसत नाहीत म्हणून अश्रू ढाळत असतील. गायीगुरांच्या डोळ्यातून अश्रूंचे ओघळ कायम सुरू असतील..गायीगुरांच्या हंबरण्यातल्या सांकेतिक भाषेतून असाही प्रश्नार्थक विचार येत असेल की, "या नभाने या भूईला दान द्यावे" असं ईश्वराकडे आता कोण पसायदान मागेल..!

ही माती या रानाच्या कानात कवी महानोरांविषयी कुजबुज करत असेल...! की, या शेताने लळा लावला असा असा की,
सुखदुःखाला परस्परांशी हसलो रडलो
आता तर हा जीवच अवघा असा जखडला
मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो

कवी या पंक्तीतून असे म्हणाले होते, मला ह्या शेताने असा लळा लावला की,आम्ही एकमेकांच्या सुखदुःखात हसलो, रडलो.... कारण मातीचे दुःख म्हणजे कोरडा दुष्काळ. मातीच्या जीवाची तलखी.... आणि शेतकऱ्याचे दुःख म्हणजे दुष्काळ पडल्यावर पीक करपून जाणे , पीक न येणे आणि शेतकऱ्यांचे फार मोठे आर्थिक नुकसान होणे हे कवीचे आणि शेतकऱ्यांचे दुःख...कवी महानोर रानाशी एकरूप झाल्यावर म्हणतात...आता तर या दुःखाचे काहीच वाटत नाही, हा जीवच असा जखडून गेला की, रानाच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो..!

कवी महानोर वयाच्या अठराव्या वर्षांपासून शेती करत होते. त्यांचे पहिले प्रेम शेतीवर आहे असं ते म्हणायचे.

मराठी काव्यविश्वाला ना.धों.महानोर यांच्या कवितेने अशी मोहिनी घातली की, त्यांच्या अमोघ वाणीतून अनेक कवितांची गीते झाली अन् ती मराठी माणसांच्या ओठांवर आली.. त्यांची गीते, लोकगीते आणि लावण्या आजही मराठी माणसांना मंत्रमुग्ध करतात. त्यांच्या कवितेवर रुक्मिणी सभागृहात संपन्न झालेल्या "पक्षी दूर देशी गेलं" ह्या कार्यक्रमात गायिका मालविका दीक्षित आणि गायक राहुल खरे यांनी " चिंब पावसानं रान झालं आबादानी" माझ्यासह अनेकांच्या आवडीचं हे गीत गाऊन रसिकांना मंत्रमुग्ध केलं.

या कार्यक्रमात कवी दासू वैद्य, प्रकाश होळकर, संजीवनी तडेगावकर, व शिव कदम आदी कवींनी महानोरांच्या अनेक कवितांचे वाचन करून काही कविता गाऊन ना.धों. महानोर यांना आदरांजली अर्पण केली. ना.धों.महानोरांनी लिहिलेल्या आम्ही ठाकर ठाकर, जांभूळ पिकल्या झाडाखाली, नभ उतरू आलं, चिंब पावसानं रान झालं आबादानी", किती जीवाला राखायाचं राखलं, राजसा जवळी जरा बसा, बाळगू कशाला व्यर्थ कुणाची भीती गं. , मी काट्यातून चालून थकले, किंवा श्रावणाचं उन्हं मला झेपेना... अशा काही लावण्यांनी व गीतांनी रसिकांच्या मनावर गारूड करून जाणारे कवी ना.धों. महानोर यांनी एका लहानशा खेड्यात राहून सुंदर शेती केली. शेतीत नवनवीन प्रयोग करून समाजात शेतीचा आदर्श निर्माण केला. कवितेने कवी महानोरांना आमदार केलं. पद्मश्री उपाधी दिली. समाजात प्रतिष्ठा आणि प्रसिद्धी दिली. महानोरही आयुष्यभर कविताच जगले. त्यांच्याकडे असलेली निसर्गदत्त प्रतिभा आणि चारित्र्यसंपन्न जीवन हे त्यांची प्रतिमा उंचावण्यासाठी कारणीभूत ठरले.

खेडेगावाविषयीचा जिव्हाळा, रानाविषयीचे प्रेम, तेथील निसर्ग, लोकपरंपरा, लोकसाहित्य, लोकसंगीत यांच्याशी कवी महानोरांची सलगी होती, अतूट नाळ होती, ऋणानुबंध होते. कविता, लोकगीते, कथा, व्यक्तिचित्रे, गोष्टी, दीर्घकथा, शेतीविषयक लेखन, गीतलेखन अशा विविध क्षेत्रातील त्यांची व्यापक स्वरुपाची मुशाफिरी ही वाखाणण्याजोगी आहे.

कवी महानोरांनी पाच ते सहा दशके महाराष्ट्रभूमीत आपल्या प्रतिभासंपन्न लेखणीचा दबदबा कायम ठेवला आहे. त्यांच्या अनेक सुंदर रचना त्यांचे नाव अजरामर करून गेल्या आहेत..त्या कविता रसिकांच्या ओठांवर रेंगाळत राहणार आहेत...परंतु त्या कवितांची निर्मिती करणारा वेल्हाळ पक्षी दूर देशी उडून गेल्याची खंत कायम मनात आणि हृदयात घर करून राहणार आहे... कविश्रेष्ठ ना.धों.महानोर यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण आदरांजली..!

# कलार समाज अजूनही न्यायाच्या प्रतीक्षेत ...!




संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**सर्व प्रथम माझ्या कलार समाजाचे आराध्य दैवत भगवान सहस्त्र बाहू अर्जून राजराजेश्वर जी यांना वंदन करते तसेच होऊन गेलेल्या सर्व महाविभूतींना कोटी, कोटी विनम्र अभिवादन करते. ह्या भारतभूमीत अनेक जातीधर्माचे लोक राहत आहेत कोणी सुखाने जगत आहेत तर कोणाला अजूनही न्याय मिळत नाही, कोणी आजही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत असे अनेक प्रश्न अनेकांचे आहेत. त्यात असलेला एक कलार समाज सुध्दा आहे. भारत देशाला स्वातंत्र्य मिळून एवढे वर्ष झाले तरीही कलार समाजाला पाहिजे तेवढ्या प्रमाणात अजूनही न्याय मिळाला नाही हि फार मोठी शोकांतिका आहे. आज सध्याच्या परिस्थितीत बघायला गेले तर महाराष्ट्र राज्यात कलार समाजाची लोकसंख्या ३० लाख एवढी आहे. अनेक राज्यात सुध्दा कलार समाज जास्त प्रमाणात आहे.**

कुठेतरी या समाजाचा शासनाला विसर पडलेला दिसत आहे. कलार समाज ओबीसी वर्गात येतो याच समाजात बहुसंख्य तरूण, तरूणी सुशिक्षित बेरोजगार आहेत तर ग्रामीण भागात राहणाऱ्या काही मुलींना बारावी नंतरचे शिक्षण इच्छा असून सुद्धा घेता येत नाही कारण पुढच्या शिक्षणासाठी त्यांना वसतिगृहे उपलब्ध नाही, कोणी एवढे गरीब आहेत की, दोन पुस्तके घ्यायला त्यांच्याकडे पैसे नाहीत सोबत अशा अनेक प्रकारच्या अडचणी आहेत त्या शासनाच्या दारापर्यत पोहोचून सुद्धा पोहचत नाही. खास करून कलार समाजाची एवढी मोठी लोकसंख्या असतांना सुद्धा स्वतंत्र महामंडळ नाही, कोणत्या सोयी नाहीत आणि जर मागायला गेले तर पूर्णपणे पाठ फिरवली जाते हे असे, कसे होऊ शकते. ..? याच मातीत मुठभर लोकसंख्या असलेल्या समाजाला महामंडळ उपलब्ध होऊ शकते हि चांगली गोष्ट आहे पण, कलार समाजाची एवढी लोकसंख्या असतांना सुद्धा का बरं मिळू शकत नाही. ..? ते भारतीय नागरिक नाहीत का...? आणि असही नाही की,कलार समाज झोपला आहे. मागे एकदा कलार समाजाला न्याय मिळावे यासाठी कलार समाजातील बहुसंख्य लोक एकत्र येऊन नागपूर येथे आंदोलन केले होते, शासनाकडे आपल्या समस्या, अडचणी मांडल्या होत्या पण, त्याचा काहीही फायदा झालेला दिसून येत नाही. त्यात पुन्हा एक अशी महत्वाची गोष्ट आहे की, मागे काही महिन्या पूर्वी अमरावती येथे कलार समाजाच्या वतीने भव्य अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्या,कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आमंत्रित करण्यात आले होते हे सर्वांना माहीत आहे. त्यांनी त्याच कार्यक्रमात जे भाषण दिले होते सर्वांनी ऐकले आहेत पण,लगेच तीन दिवसात असे काय झाले की, कळलेच नाही मुठभर लोकसंख्या असलेल्या समाजाला महामंडळ मिळाले पण, कलार समाजाचे नाव पूर्णपणे वगळण्यात आले हा खूप मोठा अन्याय शासनाने कलार समाजावर केलेला आहे. म्हणून आज सर्ववर्गिय कलार समाजातील सर्व बंधू, भगिणींनी एकत्र येणे हि अत्यंत काळाची गरज आहे . आज एवढे प्रयत्न करून सुद्धा कलार समाजाला योग्य तो,न्याय मिळत नसेल तर उद्या येणाऱ्या भावी पिढीला काहीच मिळणार नाही असाच अन्याय सहन करत रहावे लागेल वेळ आली तर दारोदारी फिरावे लागेल कदाचित त्या वेळी कोणी वाली धावून येईलच असे नाही म्हणून आज आपल्यासाठी, आपल्या हक्कासाठी,आपल्या लेकरांसाठी, विकासासाठी,आपल्या कलार समाजासाठी योग्य




तो न्याय मिळावा यासाठी कलार समाजातील सर्व लोकांनी लढले पाहिजे शासनाला आपली एकता दाखवली पाहिजे कलार समाजाचा शासनाला पूर्णपणे विसर पडलेला आहे त्याची आठवण काढून द्यायला पाहिजे कारण निवडणुकीत जसे इतर समाजातील लोक मतदान करतात तसेच कलार समाजातील सुद्धा लोक मतदान करतात आणि निवडून देतात पण,एकदा का ते निवडून आले की, विसरून जातात म्हणून पुढे होणाऱ्या निवडणुकीत मतदान करतांना जरा विचार केले पाहिजे. आजपर्यंत कलार समाजावर असल्या प्रकारचे अन्याय खूप झाले आहेत पण, पुढे हेच अन्याय सहन करण्याची वेळ येणार नाही यासाठी सर्ववर्गीय कलार समाजातील लोकांनी एकत्र आले पाहिजेत, जागे झाले पाहिजेत ही हाक केंद्र शासनापर्यंत सुद्धा गेली पाहिजे इतर समाजाला जसे स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार आहे तसेच कलार समाजाला सुद्धा स्वतंत्रपणे जगण्याचा पूर्ण अधिकार आहे, हक्क मागण्याचा अधिकार आहे जसे मतदान अधिकाराने केला जातो तसच आपला हक्क ,न्याय मागण्याचा अधिकार सुद्धा कलार समाजातील लोकांना आहे. असेही नाही की, कलार समाज जागा नाही आज कलार समाज जागतांना पाहून आनंद आहेच म्हणून मागे गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, चंद्रपूर, नाशिक तसेच छत्तीसगढ़, मध्यप्रदेश व इतर जिल्ह्यात इतर राज्यात कलार समाजाच्या हितासाठी सर्वजण एकत्र येऊन कार्यक्रम घेत आहेत, अशीच पुढेही वाटचाल कायम राहीली पाहिजेत आपला कलार समाज जगाला कळला पाहिजे त्यासाठी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी असेच पुन्हा सर्वांनी मिळून सहकार्य करावे, एकमेकांचा सल्ला, मार्गदर्शन, एकता समाजासाठी आवश्यक आहे. मागे एकदा नाशिक येथे कलाल,कलार संघटनेच्या वतीने भव्य अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते तसेच येत्या २० ऑगस्टला परतवाडा अमरावती येथे महाराष्ट्र कलाल, कलार समाजाच्या वतीने मूर्ती लहान किर्ती मोठी या, म्हणी प्रमाणे नवयुवक तरुण सागर समुद्रवार, संतोष खंबलवार यांच्या संपूर्ण टिमच्या वतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे या आयोजनासाठी मनपूर्वक अभिनंदन करते आणि या कार्यक्रमासाठी कलार समाजातील बहुसंख्य बंधू, भगिनींनी वेळात, वेळ काढून उपस्थिती दर्शवावी कारण आपल्या समाजाला न्याय हवा आहे आणि ह्या न्यायासाठी विचार विनिमय, एकता फार आवश्यक आहे कारण आपला कलार समाज अजूनही न्यायाच्या प्रतीक्षेत आहे योग्य तो न्याय मिळालाच पाहिजे यासाठी सर्वांनी सहकार्य करावे आपापसातील मतभेद विसरून जावे, हक्कासाठी लढले पाहिजे आपण अभिमानाने मी कलार समाजातील माणूस आहे असे इतरांना सांगत असतो तसच हक्काने लढले पाहिजे ही सर्वांची जबाबदारी आहे आज आपण एकत्र आलो तर पुढे अडचण जाणार नाही.

# श्यामसुंदर जाधव: मेहनतीतून व्यवसायाला आकार देणारा माणूस

आधुनिक केसरी

**आईवडील नोकरीवर, मुलानेही नोकरी करावी हीच आईवडिलांची इच्छा, मात्र तरी देखील व्यवसायच करायचा म्हणून स्वतःच्या निर्णयावर ठाम राहून व्यवसायात उडी घेतली आणि बघता बघता नांदेड सारख्या मिथ्य शहरात आपलं एक वेगळं वलय तयार केलं ते म्हणजे सुमाशंकर फर्निचरचे मालक श्यामसुंदर जाधव यांनी. माणसं वाचणं, माणसात राहणं आणि त्यांच्या सुखदुःखाचा भाग बनून सर्वसामान्यात मिसळणं हा माझा स्वभाव.त्यामुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील माणसं माझ्याशी जोडल्या गेली. माणसाशी माणूस म्हणून माणसासारखं वागत आलो.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

माणसांचा गोतावळा जमवत गेलो आणि तो गोतावळा टिकवत गेलो. वडिलांनी माणसाकडे माणूस म्हणून बघायला शिकवलं.लहान मोठा माणूस यात कुठलाही फरक न करता सर्वांशी आपुलकीने आणि तितक्याच अदबीने वागणं हिच खरी तुमची ओळख त्यामुळे आपली श्रीमंती ही तुमच्या नावावर किती एकराचा व किती प्लॉट चा सातबारा आहे आणि बँकेत किती ठेवी आहेत यावर ठरत नाही तर तुमच्या चौकटीच्या बाहेर लोकांची खेटरं किती आहेत त्यावरून तुमची लौकिक श्रीमंती ठरत असते या वडिलांच्या विचारांवर आजपर्यंत वाटचाल केल्यानेच इथपर्यंत चा प्रवास सुकर झाला आहे.

नांदेड,औरंगाबाद नंतर मराठवाड्याची राजधानी.आज नांदेड शहर झपाट्याने बदलले आहे.स्व शंकरराव चव्हाण, अशोकराव चव्हाण यांनी नांदेड चा चेहरा बदलवून टाकला आहे. सर्व सोयीसुविधा नांदेडात असल्याने सर्वच प्रकारचे व्यवसाय आज झपाट्याने वाढत आहेत.स्पर्धेत टिकुन राहण्याचे ज्यांच्याकडे कसब आहेत ते स्पर्धेच्या युगात टिकून आहेत शैक्षणिक दृष्ट्या देखील नांदेड ने कात टाकली आहे. नीट आणि जे ई ई च्या क्लास साठी अगदी मुंबई,



नागपूर, चंद्रपूर,बुलडाणा,जालना,औरंगाबाद तथा राज्यातील विविध जिल्ह्यातून मुलं क्लास साठी शिकायला येत असल्याने नांदेड आता एज्युकेशनल हब झाले आहे. माझा लहाना मुलगा देखील नांदेड ला नीट च्या तयारीसाठी असल्याने व पत्नीच मुलासोबत असल्याने माझे देखील हल्ली नांदेड शहरात येण्या जाण्याचे प्रमाण वाढले आहे.

यामुळे माझे पूर्वीचे परिचयाचे श्यामसुंदर जाधव यांच्या सुमाशंकर फर्निचर ह्या दुकानावर माझे जाणे येणे. श्यामसुंदर जाधव बी एस सी इलेक्ट्रॉनिक्स ,आई वडील नोकरीवर,आपल्या मुलानेही नोकरी करावी अशी आईवडिलांची इच्छा असतांना जाणीवपूर्वक व्यवसायात पदार्पण केले आणि स्वबळावर या माणसाने आज आपले विश्व उभे केले.

मुख्यबाजारपेठेत सुमाशंकर फर्निचर नावाचं दुकान, एक भली मोठी मयूर सिनेमा टॉकीज भाड्याने घेऊन त्यात आपला डिस्प्ले उभा केला तर एमआयडीसी मध्ये स्वतःचा कारखाना टाकून केवळ नांदेड च नव्हे तर अन्यत्र देखील आपल्या उत्पादनाला मार्केट निर्माण केले. श्यामसुंदर जाधव यांचा आज मोठा दिसणारा डोलारा या पाठीशी त्यांची मेहनत आणि चिकाटी महत्वाची आहे.सुरुवातीला रेडिओ, टीव्ही दुरुस्तीचे काम,त्यासाठी इतर जिल्ह्यातून देखील त्यांच्याकडे टीव्ही रेडियो दुरुस्ती साठी यायचे.कमी पैशात खात्रीचे काम होत असल्याने त्यांची प्रसिद्धी हस्ते पर हस्ते होत गेली,परिणामी भाड्याने घेतल्या दुकानात जागा अपुरी पडत असल्याने ते आणि त्यांचा भाऊ,दोघेही दुरुस्तीचे काम करायला लागले. टीव्ही, रेडीओ दुरुस्त जरत असतांना नंतर फ्रीज वॉशिंग माशीनही दुरुस्ती साठी यायला लागल्या. हे काम करत असतांना कमी पैशात उभे राहणारे संडास त्यांनी राज्यभर विकले.हा व्यवसाय जरत असतांना मित्र,नातेवाईक हसायला लागले. काय तर हा संडास विकतो,पण त्या कामाची लाज न बाळगता त्यातही यश मिळविल आणि नंतर फर्निचर चा व्यवसाय सुरू केला आज पर प्रांतीय कामगार देखील त्यांच्याकडे काम करत आहेत.आईवडिलांच्या इच्छेनुसार नोकरी केली असती तर जग मर्यादित राहले असते,उत्पन्न ही मर्यादित राहले असते.आज आर्थिक संपन्नता, तीन मजली दिमाखदार बंगला, बुडाखाली चार चाकी, हे सारं वैभव उभं केलं. व्यवसायात पडून रिस्क स्वीकारली आणि स्वतःला सिद्ध करून दाखविले. एकीकडे नोकरी नाही,भांडवल नाही अशी रडगणी गात पंचवीशीतील तरुणाई बेकार फिरते आहे.स्वतः काही करण्याची जिद्द असेल तर कुठल्याही परिस्थिती वर मात करून विजयी होता येत याच उदाहरण श्यामसुंदर जाधव सारखे अनेकजनांचे देता येईल. व्यवसाय करत असतांना नांदेड सारख्या शहरात श्यामसुंदर जाधव यांच्या शब्दाला वजन देखील प्राप्त झालेलं आहे. धर्मपत्नी ची मिळालेली साथ,आई वडिलांचा आशीर्वाद आणि स्वतःची मेहनत,चिकाटी यामुळेच नांदेड शहरात आपलं स्वतंत्र अस्तित्व ते प्राप्त करू शकले.

# मुलांचे भावविश्व समृद्ध करणारी 'हसरी शाळा'



उमेश मोहिते
मो. ७६६६१८६९२८

आधुनिक केसरी

**सांगली येथील प्रसिद्ध कवयित्री सौ.प्रतिभा पद्माकर जगदाळे यांच्या ' मुक्ता ' या बहुचर्चित कादंबरीनंतर ' हसरी शाळा ' हा एकूण चाळीस बालकवितांचा संग्रह नुकताच देखण्या स्वरूपात दिलीपराज प्रकाशन , पुणे यांच्याकडून प्रकाशित झाला असून या संग्रहात मुलांच्या भावविश्वाला भुरळ घालणाऱ्या चाळीस बालकविता आहेत.या सर्व बालकविता मुलांच्या भावविश्वाचा अविभाज्य घटक असलेल्या आई,बाबा,आजी, सुट्टी,मनी,पाऊस,शाळा,मैत्री,दिवाळी,पोळा,रक्षाबंधन इ. विषयांवरील असून या सर्व बालकविता अगदी ओघवत्या शैलीत आणि मुलांना परिचित अशा साध्या-सोप्या शब्दांत गुंफलेल्या आहेत. मुलांना अद्भूतरम्यतेचे नि कल्पित वास्तवाचे नेहमीच खूप आकर्षण असते.**

हे लक्षात ठेवून आणि त्यांचे निखळ मनोरंजन होऊन त्यांच्या ओठावर निर्मळ हसू फुलून त्यांना मौज,गम्मत नि



आनंद वाटावा या हेतूने शब्दबध्द केलेल्या काही कविता या संग्रहात आहेत. उदा. ' मुंगीची गाडी ' ही कविता :

**थकली मुंगी पळून पळून**<br>
**म्हणते फिरुया गाडीवरून ..**

..मुंगी पळून थकवा आला म्हणून तिच्या गाडीवरुन फिरायचे म्हणते,ही अनोखी कल्पनाच मुलांना भुरळ घालणारी आहे.अशीच पुस्तक वाचनाची उपयुक्तता सांगून मुलांच्या मनांवर पुस्तकांचे महत्त्व बिंबवणाऱ्या ' जादूचा दिवा ' या कवितेत कवयित्री म्हणते :

पुस्तक म्हणते उघड तू मला<br>
जादूचा दिवा सापडेल तुला ..

.. तसेच यातील काही बालकविता मुलांच्या संवेदनक्षम मनावर उत्तम संस्कारांचे बीजारोपण सहजसुंदरतेने करणाऱ्याही आहेत.उदा.' आई ' या कवितेमधून आई वात्सल्यमूर्ती असून ती आपली सदैव गुरु असते,असे सांगताना कवयित्री म्हणते :

**नसे फक्त ती माता**<br>
**गुरु असते आपुली**<br>
**ज्ञान देते हर क्षणाला**<br>
**उन्हात होते सावली ..**

.. . अगदी अशीच ' मैत्री ' ही बालकविता असून या कवितेतून मुलांच्या मनावर भूतदयेचे संस्कार किती सहजतेने बिंबवलेत पहा :

**करूया मैत्री साऱ्यांशी**<br>
**प्राण्यांशी अन् पक्ष्यांशी ..**

.. शिवाय मुलांना निसर्ग आणि पर्यावरणविषयक सजग भान यावे ,या अंतःस्थ हेतूने लिहिलेल्याही काही रचना संग्रहात आहेत.उदा.' नदीचे ऋण ' या कवितेतून नदी सर्वांचे पालन पोषण करते असे सांगून पुढे कवयित्री म्हणते :

**देऊ आपण वचन नदीला**<br>
**ठेवू निर्मळ त्या सरितेला**<br>
**जाणू महत्त्व शुद्ध जलाचे**<br>
**ऋण आम्हांवर बहुत नदीचे ..**

.. यासोबतच मुलांच्या माहितीत आणि ज्ञानात मोलाची भर पडावी,हा उद्देश सूचित करणाऱ्याही रचना इथे आहेत. उदा.' हुशार आजी ' या कवितेत आजीची हुशारी सांगताना कवयित्री आजीच्या बटव्यातील औषधांची माहिती देते :

**चिंगीला लागला एकदा खोकला**<br>
**आजीने लसून भाजायला टाकला**<br>
**पाकळ्या खाताच खोकला पसार**<br>
**बटव्यात आजीच्या औषध तयार ..**

.. मुलांचे संपन्न व्यक्तिमत्त्व घडून त्यांचे उज्ज्वल भवितव्य आकाराला यावे , या आंतरिक उर्मीने रचलेल्या उपदेशपर काही बालकविताही संग्रहात आहेत.उदा.' मोबाईलला देऊ सुट्टी ' या कवितेमधून मोबाईलचा अतिरिक्त हव्यास त्यागून मुलांनी मैदानी खेळाचा स्वीकार करावा असे आवाहन करताना कवयित्री म्हणतेः

**शिस्तीत होतील कवायती**<br>
**व्यायामाला देऊया गती**<br>
**तबियतही होईल धट्टीकट्टी**<br>
**मैदानाशी रे करुया गट्टी ..**

.. मुलांनी डोळ्यांसमोर चांगले ध्येय ठेवून अथक परिश्रम करावेत आणि आपले इच्छित ध्येय साध्य करावे,असा मौलिक उपदेश कवयित्री सौ.प्रतिभा पद्माकर जगदाळे ' वाट ' या कवितेतून करताना म्हणतात :

**अभ्यासाने होते प्रगती**<br>
**कष्टास जरा देऊया गती**<br>
**मोठे शिक्षण घेऊ आपण**<br>
**ध्येय चांगले ठेवू आपण ..**




.. एकूणात ' मनोरंजन करील जो मुलांचे,प्रभुशी नाते जडेल तयाचे ' या उक्तीप्रमाणे सौ.प्रतिभा पद्माकर जगदाळे यांच्या ' हसरी शाळा ' या बाल कविता संग्रहातून मुलांचे मनोरंजन तर होतेच,पण त्यासोबतच त्यांच्या ज्ञानात नि माहितीत भर पडून त्यांचे भावविश्वही अधिक समृद्ध होणार आहे आणि म्हणूनच मुलांच्या आवडीच्या विषयांवरील या गेय बालकविता मुलांना ठेका धरायला लावणाऱ्या असून त्या बाल-कुमार वाचकांच्या पसंतीस पडतील,हे नक्की ! प्रस्तावनेत ज्येष्ठ बालसाहित्यकार सुभाष कवडे म्हणतात त्याप्रमाणे ' हा बालकवितासंग्रह बालसाहित्यविश्वात लक्षणीय ठरेल ' यात शंका नाही.म्हणूनच उत्तम दर्जाची निर्मितीमूल्य असलेला आणि संतोष घोंगडे यांच्या रेखाचित्रांनी सजलेला हा देखणा बालकविता संग्रह मुलांसोबतच त्यांच्या पालकांनीही वाचावा असा आहे. हेच कवयित्री सौ.प्रतिभा पद्माकर जगदाळे यांचे यश आहे. म्हणूनच त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि त्यांच्या पुढील लेखनास हार्दिक शुभेच्छा ! !

**हसरी शाळा – ( बालकविता )**<br>
**कवयित्री – सौ.प्रतिभा पद्माकर जगदाळे**<br>
**प्रकाशक – दिलीपराज प्रकाशन,पुणे**<br>
**पृष्ठे – ५६**<br>
**मूल्य – १७० रु.**<br>
**मुखपृष्ठ – संतोष घोंगडे**



# चांगल्याचे भले

आधुनिक केसरी

बिरबल एक ईमानदार व धर्मप्रिय व्यक्ती होता. तो दररोज कशाचीही अपेक्षा न करता देवाची प्रार्थना करायचा. देवाच्या प्रार्थनेमुळे त्याला आत्मिक समाधान व मानसिक बळ मिळत असे. बिरबल नेहमी म्हणायचा की 'देव जे काही करतो, ते मनुष्याच्या भल्यासाठीच असते'. कधी कधी आपल्याला असे वाटते की देवाचे आपल्याकडे लक्ष नसावे परंतु असे नसते. कधी कधी देवाच्या आशीर्वादाला लोक शाप समजण्याची चूक करतात. तो आपल्याला थोडे कष्ट देतो, कारण आपण येणाऱ्या मोठया संकटापासून स्वतःला वाचवू शकू. एका दरबाऱ्याला बिरबलचे हे बोलणे आवडत नसे. एक दिवस तो दरबारामध्ये बिरबलला उद्देशून बोलला – हे बघ, देवाने माझ्याबरोबर काय केले. काल रात्री जेव्हा मी जनावरांसाठी चारा कापत होतो तेव्हा अचानक माझ्या हाताची करंगळी कापली गेली. तरी तू असेच बोलशील की देव जे काही करतो, ते मनुष्याच्या भल्यासाठीच करतो ?

काही वेळ स्तब्ध राहून बिरबल बोलला – माझा आत्तापण देवावर विश्वास आहे कारण 'देव जे काही करतो, ते मनुष्याच्या भल्यासाठीच असते'. हे ऐकून तो दरबारी नाराज झाला व म्हणाला – माझी करंगळी कापली गेली तरीपण बिरबलला यात चांगलेच काहीतरी दिसते आहे. माझे कष्ट जसे काहीच नाही. अन्य दरबाऱ्यांनी पण त्या दरबाऱ्याच्या सुरात सूर मिळविला. तेव्हा बादशाह अकबर बिरबलला बोलला मी पण देवावर विश्वास ठेवतो पण, मी तुझ्याशी सहमत नाही. या दरबाऱ्याच्या बाबतीत असे काहीही घडलेले नाही की ज्यासाठी देवाची प्रशंसा केली जावी.

बिरबल स्मितहास्य करत बोलला – 'ठिक आहे महाराज, आता योग्य वेळ आल्यावरच आपल्याला कळेल'. तीन महिन्यानंतर करंगळी कट झालेला दरबारी घनदाट जंगलात शिकारासाठी गेला. जेव्हा तो हरणाच्या मागे गेला तेव्हा तो बाकीच्या सहकाऱ्यापासून वेगळा झाला, व अचानक त्याला आदिवासींच्या एका घोळक्याने पकडले जे की देवाला प्रसन्न करण्यासाठी नरबळीवर विश्वास ठेवायचे. त्यामुळे ते आदिवासी त्या दरबाऱ्याला पकडून बळी देण्यासाठी मंदिरात घेऊन गेले. पण जेव्हा मंदिराच्या पुजाऱ्याने दरबाऱ्याच्या शरीराचे निरिक्षण केले तेव्हा त्याला त्याच्या हाताची करंगळी कापलेली असल्याचे आढळले व तो बोलला की 'बळीसाठी हा व्यक्ती चालणार नाही'. मंदिराचा तो पुजारी बोलला – जर आपण हाताला नऊ बोटे असलेल्या माणसाचा बळी दिला तर आपले देव प्रसन्न न होता क्रोधित होतील कारण, त्यांना अपूर्ण बळी आवडत नाही व आपल्याला महामारी, पूर किंवा दुष्काळाला सामोरे जावे लागेल. त्यामुळे या दरबाऱ्याला सोडून देणे हे आपल्यासाठी उचित असेल व त्यांनी त्या दरबाऱ्याला सोडून दिले. दुसऱ्या दिवशी, तो दरबारी दरबारात बिरबलकडे जावून रडायला लागला तेव्हा महाराज पण दरबारात आलेले होते व त्या दरबाऱ्याला बिरबलकडे रडताना पाहून चकित झाले. तुला काय झाले, तु का रडतो आहेस ? – महाराज अकबरने दरबाऱ्याला विचारले. उत्तरादाखल दरबाऱ्याने घडलेला पूर्ण वृत्तांत महाराजांना सांगितला व तो म्हणाला – आता माझा विश्वास बसला आहे की, 'देव जे काही करतो, ते माणसाच्या भल्यासाठीच असते'. जर माझी करंगळी कापली गेली नसती तर मला बळी चढविले गेले असते त्यामुळे मी रडत आहे, पण हे माझे आनंदअश्रू आहेत कारण मी जिवंत आहे. बिरबलच्या देवावरचा विश्वासावर शंकेच्या दृष्टिने बघणे ही माझी चूक होती. महाराज अकबर सौम्य हासत दरबाऱ्याकडे बघत होते, जे खाली मान घालून शांतपणे उभे होते. महाराजांना आता अभिमान वाटत होता की बिरबल सारखा बुध्दिमान व्यक्ती आपल्या दरबारातील एक आहे.

**तात्पर्य – जे काही होते ते चांगल्यासाठीच होते.**

# आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न व्हावेत!

## प्रा.डॉ. विठ्ठल जायभाये : जागतिक आदिवासी दिनानिमित्त व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**सोनपेठ :** येथील कै.रमेश वरपुकर महाविद्यालयात समाजशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. डॉ.विठ्ठल जायभाये बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रो.डॉ.मुक्ता सोमवंशी उपस्थित होत्या तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.विठ्ठल जायभाय आणि डॉ.शिवाजी अंभोरे हे उपस्थित होते. या प्रसंगी बिरसा मुंडा यांचे जीवन व कार्य या विषयावर आधारित मान्यवरांच्या हस्ते भीत्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांनी बिरसा मुंडा या क्रांतिकारकाने आदिवासींच्या हक्क अधिकारासाठी ब्रिटिशांच्या विरुध्द कशी झुंज दिली याविषयी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. भारत एक विकसनशील देश म्हणून आपण एकविसाव्या शतकात वाटचाल करत असतांना भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आज साजरा केला जातो आहे. भारत देशाने या कालावधीत अनेक क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केलेली आहे, परंतु अजूनही काही भूप्रदेशातील आदिवासी समाजात पाहिजे त्याप्रमाणे विकास झालेला नाही. आदिवासी समाजाच्या विकासाकरिता शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. आदिवासी हे सर्वात मागासलेले, अशिक्षित, साधे जीवन जगणारे, जंगलाच्या पायथ्याशी राहणारी लोक आहेत. पूर्वी जंगलाचे राजे म्हणून ओळखले जाणारे आदिवासी लोकांचे जीवनमानाचा दर्जा अपेक्षित असा उंचावलेला नाही. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या जीवनावश्यक गरजांची पूर्तता त्यांना हवी तशी होत नाही. आदिवासी समाजातील निरक्षरता हे त्यांच्या अनेक समस्यांचे मूळ कारण आहे. आजच्या आधुनिक समाज जीवनात आदिवासींचे जीवनमान अंधकारमय आहे असे प्रतिपादन डॉ.विठ्ठल जायभाये यांनी केले. डॉ.शिवाजी अंभोरे यांनी आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने कोणत्याही देशातील मूळ रहिवासींना आदिवासी म्हटले जाते. आदिवासी हा एक सरळ, साधा, सामाजिक समूह आहे. यातील सर्व सदस्य एकच समान बोलीभाषा चा वापर करतात व उद्देश



पूर्तीसाठी ते एकत्र येतात. जगातील सर्व देशांमध्ये आदिवासी जमाती आहेत. विविध देशांमध्ये त्यांना वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते. आदिवासी, गिरीजन / मागासलेले हिंदू, रेड इंडियन, जिप्सी या नावाने संबोधले जाते अशी माहिती त्यांनी दिली. अध्यक्षीय समारोप करताना डॉ.मुक्ता सोमवंशी यांनी आदिवासींचे युरोप खंडातील देशांमध्ये फार झपाट्याने आधुनिकीकरण होत असुन शिक्षण, विकास, आधुनिकीकरण आणि शहरीकरणाचा प्रभाव ग्रामीण समाज जीवनाप्रमाणे आदिवासीवरही पडू लागला आहे, परंतु आदिवासींनी त्यांच्या बोलीभाषा आणि संस्कृती जतन करून ठेवले आहे असे म्हटले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ.सुनिता टेंगसे यांनी केले. याप्रसंगी त्यांनी आदिवासी दिन का साजरा केला जातो ? त्याची आवश्यकता का आहे ? हे विशद करताना भारतात आदिवासी लोकांची संख्या चार कोटी पेक्षा अधिक आहे. महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येपैकी सहा टक्के आदिवासी ची संख्या आहे. एका लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या जमाती भिल्ल, महादेव कोळी ,गोंड ,वारली, कोरकू ,ठाकूर, कातकरी व गावीत या आठ जमातींचा समावेश होतो. या जमाती प्रामुख्याने ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अमरावती, चंद्रपूर, नगर, पुणे व कुलाबा या जिल्ह्यात वास्तव्य करतात. सर्व आदिवासी जमातींच्या हक्क आणि अधिकाराचे संरक्षण करून त्यांना मुख्य प्रवाहात सहभागी करून घेण्याची जबाबदारी ही प्रशासन, अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांची आहे असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथम वर्षाची कु.वैष्णवी पाटील हिने केले तर आभार कु.राधिका विटकर हिने मानले. या कार्यक्रमास समाजशास्त्र, इंग्रजी, लोकप्रशासन, इतिहास विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



# गुणवंत विद्यार्थिनींच्या हस्ते ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** स्वातंत्र्यदिनानिमित्त दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करून सत्कार करून एक नवा आदर्श आपेगाव येथे निर्माण झाला आहे.

पैठण तालुक्यातील आपेगाव येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक कल्याण म्हस्के हे सतत नवनवीन प्रयोग करत असतात, गेल्या वर्षीपासून त्यांनी ईयत्ता दहावीच्या परिक्षेत वर्गात ज्या विद्यार्थ्यांना जास्त टक्के गुण मिळवले आहेत. त्याच्या हस्ते स्वतंत्रदिनाला शाळेत ध्वजारोहण करण्याचा मान देवु केल्याने विद्यार्थी तसेच पालक वर्गात आनंदाचे वातावरण पहायला मिळत असून या स्वतंत्रदिनी कु.वैष्णवी संजय औटे हिने दहावीला प्रथम क्रमांक ने उत्तीर्ण झाल्याने आपल्याच शाळेत स्वतः ध्वजारोहण करण्यात आल्याने आनंद झाल्याचे चित्र पहावयास मिळाले. यावेळी मुख्याध्यापक कल्याण म्हस्के, सरपंच पोपट औटे, उपसरपंच सोमनाथ औटे, पोलीस पाटील संजय गडकर, राम औटे, वैजनाथ औटे तसेच शिक्षकाची उपस्थिती होती.

# शारदा वानखेडे यांच्या आई तू... काव्यसंग्रहास राज्यस्तरीय साहित्य गौरव पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**परभणी :** राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ आणि श्रावस्ती सामाजिक शैक्षणिक संशोधन प्रतिष्ठान, परळी वैजनाथ जिल्हा बीडच्या वतीने आयोजित ६व्या राज्यस्तरीय साहित्य गौरव पुरस्कारासाठी परभणी येथील कवयित्री व लेखिका सौ. शारदा श्रीकृष्ण वानखेडे -चोपडे यांच्या आई तू... या काव्यसंग्रहाची निवड झाली आहे. राज्यातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांनी पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवले होते. या प्रस्तावातून आई तू... या काव्यसंग्रहासाठी साहित्यिक गौरव पुरस्कार सौ.शारदा वानखेडे यांना जाहीर झाला आहे. निवड समितीद्वारे त्यांना तसे कळविण्यात आले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. परळी वैजनाथ येथे होणाऱ्या पुरस्कार सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

# आंतरभारती, अंबाजोगाईने नरपती कुंजेडा या वॉचमनला दिला स्नेहसंवर्धन पुरस्कार



आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** नरपती कुंजेडा हे रात्र प्रहरी ( नाईट वॉचमन ). नेपाळहून येऊन आंबाजोगाईत स्थायिक झालेले. जवळपास न शिकलेला हा माणूस. याने आपल्या मुलीला पदवीधर केले. मुलगा इंजिनियर केला. 15 ऑगस्ट 23 रोजी आंतरभारती, आंबाजोगाईच्या वतीने त्यांना स्नेहसंवर्धन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

अन्य प्रांतातून येऊन आंबाजोगाई येथे स्थायिक झालेल्या व आंबाजोगाईच्या गौरवात भर घालणाऱ्या व्यक्तीला दर वर्षी 15 ऑगस्टला हा पुरस्कार दिला जातो. यंदा दहावा पुरस्कार होता. अजितकुमार कुरूप ( केरळ ) यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नरपती कुंजडा यांच्या पत्नी चंद्रकलाताई यांचा सत्कार मनीषा आर्य यांनी केला.

हैदराबादच्या मनीषा राणी आर्य व आंतरभारतीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष अमर हबीब यांनी प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन केले. पूर्व सत्कारमूर्ती शशिकांत रुपडा ( गुजरात ), आनंद अंकम ( तेलंगणा ), राजू जांगीड ( राजस्थान ) मंचावर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचा सन्मान-

म. गांधी प्रश्नावली परीक्षेत उत्तम कामगिरी करणाऱ्या गावातील 9 वीच्या निवडक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेत ऋषिकेश मुंडे ( मराठी ), संपदा वाघ ( इंग्रजी ) व फुरखान सादेख अली ( उर्दू ) सर्वप्रथम निवडले गेले. 14 मराठी, 8 इंग्रजी व 6 उर्दू माध्यमाच्या शाळांनी यात भाग घेतला होता. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन ज्योती शिंदे यांनी केले. अनिता कांबळे यांनी परिचय करून दिला. डॉ. पद्माकर घोरपडे यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. महावीर भागरे ( संयोजक ) यांनी आभार मानले. सहसंयोजक शरद लंगे यांनी प्रास्ताविक भाषण केले. शाखा अध्यक्ष दत्ता वालेकर अध्यक्षस्थानी होते, सचिव वैजनाथ शेंगुळे, अनिकेत डिघोळकर आदींनी कार्यक्रमाची तयारी केली. आंबाजोगाईकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गांधी विसरून चालणार नाही – अमर हबीब

महात्मा फुले यांनी एकमय लोक झाल्याशिवाय देश निर्माण होणार नाही असे म्हटले होते. म.गांधी यांनी विखुरलेल्या भारतीयाना देश म्हणून एकत्र आणले होते. म. गांधीला सोडून या देशाची कल्पना देखील करता येणार नाही. गांधी पुसून टाकण्याचे प्रयत्न देशाला महाग पडतील असे मत आंतरभारतीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष अमर हबीब यांनी या प्रसंगी व्यक्त केले. 'हम सब एक हैं' ही भावना दृढ करण्यासाठी स्नेहसंवर्धन पुरस्कार दिला जातो असे त्यांनी सांगितले.



# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत शेकडो तरुणांचा, सामाजिक कार्यकर्त्यांचा प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये असंख्य तरुण व सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या विचारांवर तसेच तसेच प्रदेशअध्यक्ष श्री जयंतराव पाटील साहेब, संसदरत्न खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच धुळ्याचे जिल्हाध्यक्ष श्री रणजित राजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली असंख्य तरुणांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला.

सदर कार्यकर्त्यांना ज्येष्ठ नेते एन..सी. पाटील व राष्ट्रीय खजिनदार श्री जोसेफ मलबारी यांच्या हस्ते प्रवेश देण्यात आला. प्रवेश घेणाऱ्यांमध्ये साक्री रोडवरील तुषार वाघ त्यांचे सहकारी, मुस्लिम भागातील सामाजिक कार्यकर्त समाजवादीचे पदाधिकारी जाकीर शेख, वाडीभोकर रोडचे युवा नेतृत्व आकाश बैसाने व त्यांचे सहकारी, देवपुरातील वैभव पाटील व त्यांचे सहकारी, नकाणे रोडचे मयुर शिंदे तसेच माजी सैनिक युनुस शेख, युसुफ शेख, एअर फोर्सचे सेवानिवृत्त अधिकारी युनूस मिर्झा, अंकुश पाटील, शरद अहिरे, प्रशांत गवळी, राहुल चव्हाण, यश पाटणी, आदी युवक व सामाजिक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्या.यावेळी पक्षाचे मोठ्या संख्येने कार्यकर्ते, युवक, विद्यार्थी, महिला, जेष्ठ, कार्यकारणी सदस्य, विविध आघाडीचे /सेलचे अध्यक्ष आदी उपस्थित होते. सर्वांनी आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांच्या विचारावर काम करण्याचा निर्णय घेतला.

# पत्रकार सुरक्षा कायद्याची कठोर अंमलबजावणी करा

## जळगाव जामोद तालुक्यातील पत्रकारांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगाव जा :** पत्रकार संरक्षण कायद्याची कठोर अंमलबजावणी करून पत्रकारावरील हल्ल्याचे खटले जलदगती न्यायालयामार्फत चालवण्यात यावे व किशोर पाटील यांच्यावर कारवाई करण्यात यावी यासाठी जळगाव जामोद तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांनी उपविभागीय अधिकारी यांचे मारफत मुख्यमंत्र्यांना आणि पोलीस निरीक्षक जळगाव जामोद यांचे मारफत जिल्हा पोलीस अधीक्षक बुलढाणा यांना आज १७ ऑगष्ट रोजी निवेदन देण्यात आले....

याबाबत सविस्तर वृत्त असे की, महाराष्ट्रात 8 नोव्हेंबर 2019 पासून पत्रकार संरक्षण कायदा लागू झाला आहे. हा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे याचा आम्हाला नक्कीच अभिमान आहे. महाराष्ट्राचा हा कायदा पुरेसा सक्षम आणि चांगला असला तरी त्याची अंमलबजावणी होत नसल्याने तो आता कुचकामी ठरला आहे. राज्यात गेल्या चार वर्षात जवळपास 200 पत्रकारांनवर हल्ले झाले, किंवा त्यांना धमक्या शिविगाळ केल्या गेली, मात्र केवळ 37 प्रकरणातच पत्रकार संरक्षण कायदा लागू केल्याने आणि त्यातील एकाही प्रकरणात आरोपीला शिक्षा न झाल्याने या कायद्याची उपयुक्तता संपली असून कायद्याची भीतीच समाजकंटकांच्या मनात उरली नाही. त्यामुळे महाराष्ट्रात पुन्हा एकदा चिंता वाढली आहे. अलिकडेच पाचोरा येथील संदिप महाजन या पत्रकारास आमदार किशोर पाटील यांनी अगोदर शिवीगाळ केली आणि दुसऱ्या दिवशी आपल्या गुंडानी त्यांच्यावर हल्ला चढविला.. हे चित्र उभ्या



महाराष्ट्राने पाहिले, ऐकले आहे. असे असले तरी मारहाण करणाऱ्या गुंडांवर किंवा शिवीगाळ आणि धमक्या देणाऱ्या आमदार किशोर पाटील यांच्यावर पत्रकार संरक्षण कायद्याखाली गुन्हा दाखल झालेला नाही. पत्रकारावर जे हल्ले होतात त्यातील 75 टक्क्यांवर हल्ले हे राजकीय पक्षाच्या नेत्यांकडून किंवा त्यांच्या कार्यकत्यांकडून होतात, हे वास्तव आकडेवारीसह समोर आलेले आहे. मग असा प्रकरणात राजकीय हस्तक्षेप होतात आणि पोलीस पत्रकार संरक्षण कायद्याचं कलम न लावता साधी एन सी दाखल करून हा विषय बंद करून टाकतात. असे प्रकार वारंवार सर्वत्र दिसून येत आहेत. हे थांबलं पाहिजे आणि पत्रकारांना निर्भय वातावरणात काम करता आल पाहिजे. आणि या कायद्याची कठोर अंमलबजावणी झाली पाहिजे यासाठी जळगाव जामोद तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांनी उपविभागीय अधिकारी यांचे मारफत मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले आहे. निवेदन देते वेळी पत्रकार सागर झनके, संतोष कुलथे, गोपाल अवचार, संजय दांडगे, रा जू वाढे, राजेश बाठे, लीयाकत खान, विनोद वानखडे, अनिल भगत, अमोल भगत, भिमराव पाटील, गणेश भड, नागेश भटकर, शिवदास सोनोने, राजकुमार भड, गजानन खिरोडकर आदी पत्रकार हजर होते.



## राजूर येथे व्यापारी महासंघातर्फे सहायक पोलिस निरीक्षक शिवाजी नागवे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** भोकरदन तालुक्यातील हसनाबाद पोलिस ठाण्यात नव्याने रुजू झालेले सहायक पोलिस निरीक्षक शिवाजी नागवे यांचा राजूर व्यापारी महासंघाच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सर्वप्रथम सपोनि शिवाजी नागवे यांना व्यापारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांचा परिचय करून देण्यात आला. व्यापाऱ्यांची सुरक्षा आणि इतर विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी सहायक पोलिस निरीक्षक शिवाजी नागवे यांनीही व्यापाऱ्यांच्या चर्चेस सकारात्मक प्रतिसाद दिला. यावेळी व्यापारी महासंघाचे जिल्हा सचिव जगन्नाथ थोटे, भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते भगवानराव नागवे, राजूर व्यापारी महासंघाचे शहर अध्यक्ष सारंगधर बोडखे, माजी सरपंच गजानन नागवे, अण्णासाहेब भालेराव, व्यापारी महासंघाचे सचिव रामेश्वर कढवणे, व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष रामचंद्र नागवे, रामेश्वर नागवे, अंकुश नागवे, मुकेश अग्रवाल, आदमाने सर, प्रा. बाळासाहेब बोराडे, सोपान जावळे, लहु शेजुळ, लक्ष्मण कांबळे, देविदास खरात, मोहन बोडखे, विकास राठोड यांसह अनेकजण उपस्थित होते.

## लोकशाही बळकट करण्यासाठी सर्वांनीच मतदानाचा हक्क बजावला पाहिजे : वायाळ

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण च्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व तहसील कार्यालय, पैठण यांच्या संयुक्त विद्यमाने 'मतदान जनजागृती मोहीम व मतदार नोंदणी शिबीर' संपन्न झाले. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते कै. खंडेराव जी पाटील शिसोदे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. सोहम वायाळ तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद सोनकांबळे आणि प्रमुख उपस्थितीत उपप्राचार्य डॉ. प्रकाश तुरूकमाने, स्टाफ सेक्रेटरी डॉ. रमाकांत तिडके, पर्यवेक्षक प्रा. वैजिनाथ चाटे, श्री. विष्णुपंत घुगे, श्री. गणपत मिटकर व श्री. अमोल पाखरे हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. सोहम वायाळ यांनी मतदान जनजागृती व मतदार नोंदणी विषयी उत्कृष्ट सविस्तर असे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच मतदानाविषयी अधिक जागृत असले पाहिजे असा मोलाचा सल्ला दिला. मतदान करण्यासाठी मतदार यादीत नांव असणे किती महत्त्वाचे असते याचा आवर्जून उल्लेख करत, विशेष बाब म्हणजे लोकशाही बळकट करण्यासाठी सर्वांनीच मतदानाचा हक्क बजावला पाहिजे असे ठणकावून सांगत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. समर्पक अध्यक्षीय शुभेच्छा पर समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद सोनकांबळे यांनी केला.

गणपत मिटकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तर श्री. विष्णुपंत घुगे व डॉ. रमाकांत तिडके यांनी मतदान जनजागृती मोहीम व मतदार नोंदणी विषयी थोडक्यात मनोगत व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दीपक भुसारे यांनी तर आभार डॉ. प्रभाकर कुटे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रासेयो च्या डॉ. अपर्णा पाटील, डॉ. ममताराम करे व राजू हिवराळे यांनी विशेष प्रयत्न केले. तर कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीता ने झाली.





## आखाड्यावरून घरी जाणाऱ्या युवकाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** चारठाणा येथुन जवळच असलेल्या चिकलठाणा बु. ( ता.सेलु ) शिवारातील शेत आखाड्यावर वास्तव्यात असलेल्या युवकांचा दुचाकीने घरी जात असताना अपघाती मृत्यू झाला. ही घटना दि.१६ बुधवारी रोजी सायंकाळी ५:१५च्या सुमारास घडली यामध्ये पंढरीनाथ अंकुश पिंतळे असे मयत युवकांचे नाव आहे. पंढरीनाथ हा आई वडीलासह त्याचे कुटूंब हे चिकलठाणा बु शिवारातील शेतांत वास्तव्यात आहेत. पंढरीनाथ हा कामानिमित्त बाहेरगावी गेला होता दुचाकीने ( MH-21-BB-7823 ) सेलूवरून शेत आखाड्याकडे परताना चिकलठाणा बु पाटीदरम्यान सेलूकडे भरधाव वेगाने धावणाऱ्या इनोव्हाची ( MH-20-CA-9595 )या दुचाकीला जबर धडक बसली. या अपघातात मयत झाल्याने चिखलठाणा गावात शोकाकुल वातावरण निर्माण झाले आहेत.

## सत्ताधाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे धुळेकर पाण्यापासून वंचित : आ. फारुख शाह

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** धुळेकरांचा पाणीप्रश्न कायमचा सुटावा यासाठी शासनाने अक्कलपाडा योजना मंजूर करून भरीव निधी उपलब्ध करून दिला आहे. मात्र निव्वळ मनपा सत्ताधा -यांच्या दुर्लक्षामूळे धुळेकर पाण्यापासून वंचित राहिल्याची टीका आ. फारुख शाह यांनी अक्कलपाडा योजना पाहणी दौ-या प्रसंगी केली. धुळेकर नागरिकांना एक दिवसाआड नियमित पाणी मिळावे यासाठी गेल्या वर्षभरापासून धुळे महानगरपालिकेचे सत्ताधारी आश्वासन देत होती. मात्र प्रत्यक्षात योजनेचे काम कुठवर आले याबाबतची सत्यपरिस्थिती सातत्याने लपवली जात होती. ही महत्त्वाची बाब धुळेकर जनतेला कळावी म्हणून आमदार फारुख शाह यांनी पहाणी दौऱ्याचे आयोजन केले होते. प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर सत्ताधाऱ्यांनी आतापर्यंत केलेली लपवा लपवी प्रकर्षाने लक्षात आली. प्रकल्पातून



पाणी उचलण्यासाठी आवश्यक असणारा वीज पुरवठा करणेसाठी उशिराने ३३केव्ही सबस्टेशन उभारण्याचे नियोजन केले जाते. ही बाब एकूणच विचार करायला लावणारी आहे. योजना पूर्ण झाली म्हणून चार महिन्यांपूर्वी एकमेकांना पेढे भरविणारांची अवस्था म्हणजे नवरदेवाला लग्नासाठी बोहल्यावर चढवायचे आणि मंडपातून नवरी गायब अशी झालेली आहे. पाहणी प्रसंगी आ. फारुख शाह यांनी ३३केव्ही सबस्टेशन येत्या पंधरा दिवसात कार्यान्वीत करून तीनही पंप चालू करण्यात यावे असे मनपा, मजीप्र आणि वीज वितरण कंपनीच्या आधिका-यांना आदेश दिलेत. यामुळे धुळेकर नागरिकांना किमान दोन दिवसाआड पाणी देता येईल. तसेच यापूर्वी मनपा ने मागणी केल्यानुसार जलकुंभांचे छत, शहरातील वितरण व्यवस्था सक्षम करण्यासाठी व्हॉल्व, काही ठिकाणी नवीन पाईप लाईन साठी राज्य शासनाकडून ५कोटी उपलब्ध करून देण्याचे आ. फारुख शाह यांनी जाहीर केले. वितरण व्यवस्था सक्षम झाली म्हणजे एकदिवसाआड पाणी देणे सुलभ होईल. अक्कलपाडा योजना पाहणी दौ-या प्रसंगी आ. फारुख शाह यांच्या सोबत डॉक्टर दीपश्री नाईक, नगरसेवक नासिर पठाण, नगरसेवक सईद बेग, प्यारेलाल पिंजारी, डॉ. बापूराव पवार, कैसर अहमद, असद अन्सारी, जावेद मिर्जा, आसिफ मुल्ला, असिफ शाह, इब्राहिम पठाण, फिरोज शाह, शब्बीर शाह, समीर शाह, सलमान पिंजारी, महानगरपालिका उपायुक्त विजय सनेर, अभियंता कैलास शिंदे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे कार्यकारी अभियंता वानखेडे, वीज वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता भामरे आदी उपस्थित होते.

## महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवर पोलीस-नक्षल्यांमध्ये धुमश्चक्री

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील बिजापूर जिल्ह्यातील भोपाळपट्टणम् जंगल परिसरात उडालेल्या चकमकीत नक्षल्यांचा तळ उद्ध्वस्त करण्यात पोलिसांना यश आले. स्वातंत्र्यदिनाच्या रात्री प्राप्त गोपनीय माहितीच्या आधारे गडचिरोली पोलिसांच्या सी- ६० पथकातील २०० जवान व डीआरजीच्या ७० कमांडोंनी मिळून अभियान राबविले होते. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा झाल्यानंतर रात्री छत्तीसगडच्या उत्तरेला बिजापूरच्या भोपाळपट्टणम येथील संड्रा परिसरात काही नक्षली तळ ठोकून होते, अशी माहिती गडचिरोली पोलीस दलाला मिळाली. त्यानुसार, पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी बिजापूर येथील पोलीस अधीक्षकांना संपर्क केला. अहेरीचे अपर अधीक्षक यतीश देशमुख यांच्या नेतृत्वाखाली २०० सी-६० जवान रवाना केले. बिजापूरचे सहायक अधीक्षक व ७० डीआरजी कमांडो यांच्या पथकाने संयुक्त अभियान राबविले. यावेळी नक्षल्यांनी पोलिसांच्या दिशेने अंदाधुंद गोळीबार केला, पोलीस पथकांनी प्रत्युत्तर दिले. यावेळी पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये जोरदार चकमक उडाली. मुसळधार पाऊस आणि घनदाट जंगलाचा आधार घेत नक्षल्यांनी घटनास्थळावरून पळ काढला. पोलीस जवानांनी संपूर्ण नक्षली तळाची झडती घेतली असतामोठ्या प्रमाणात नक्षली साहित्यासह मोबाइल, ताडपत्री, भांडी असे संसारोपयोगी साहित्य जप्त केले आहे.




# शेख मोहसीनची हाँगकाँग, थायलंडविरुद्ध होणाऱ्या क्रिकेट दौऱ्यासाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील दिव्यांग खेळाडू शेख मोहसीन याची तिसऱ्या वेळी आंतरराष्ट्रीय क्रिकेट दौऱ्यासाठी निवड झाली आहे. दिव्यांग क्रिकेट कंट्रोल बोर्ड ऑफ इंडियाच्या वतीने मिळालेल्या पत्रकानुसार कन्नड येथील निवासी शेख मोहसीन याची होंगकोंग व थायलंड येथे या दोन्ही देशांविरुद्ध होणाऱ्या पाच टी २० सामन्यासाठी भारतीय दिव्यांग संघात निवड झाली असून यापूर्वी मोहसीन बांगलादेश व श्रीलंका या दोन्ही संघाविरुद्ध आंतरराष्ट्रीय सामने खेळला असून, तो डाव्या हाताने फलंदाजी व गोलंदाजी करणारा अष्टपैलू खेळाडू आहे. मागील दौऱ्यात त्याच्या उत्कृष्ट प्रदर्शनामुळे सदरील दौऱ्यासाठी



त्याची पुन्हा निवड करण्यात आली आहे.

सदरील सामने ८ ते १५ ऑक्टोबर या दरम्यान होणार असून त्यासाठी भारतीय दिव्यांग संघ ५ ऑक्टोबर रोजी कोलकत्ता येथून रवाना होणार आहे.

सध्या शेख मोहसीन याचा सराव एस क्लब व स्पोर्ट्स अकॅडमी कन्नड येथे जोरात सुरू असून त्या क्रिकेट प्रशिक्षक योगेश पाटील व प्रवीण कुलकर्णी याचे मार्गदर्शन लाभत आहे. मोहसीनच्या निवडीबद्दल दिव्यांग क्रिकेट कंट्रोल बोर्ड ऑफ इंडियाचे सचिव हरून रशीद, उपाध्यक्ष डॉ भगवान तलवारे, महाराष्ट्र झोनलचे प्रमुख उत्तम मिश्रा, खेळाडू जमीर पठाण, सुमित रायले व एस क्लब व स्पोर्ट्स अकॅडमी चे अध्यक्ष सय्यद अख्तर सचिव योगेश पाटील व खजिनदार शोयेब अली आदींनी अभिनंदन केले आहे.




# संत निरंकारी भवन येथे ६२१ रक्तदात्यांनी केले रक्तदान

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने मुक्तीपर्व दिवस तसेच स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून व शासकीय विभागीय रक्तपेढीत रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी दि.15 ऑगस्ट मंगळवार रोजी सन्त निरंकारी चेरिटेबल फाउंडेशन, शाखा सिडकोच्या वतीने विशेष महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन घाटीचे प्रभारी अधिष्ठाता प्रसाद देशपांडे यांच्या हस्ते झाले यावेळी मा.खासदार चंद्रकांत खैरे, मंडळाचे जिल्हा संयोजक डी जी दळवी, क्षेत्रीय संचालक विजय बोडखे, बुलंद छावा चे सुरेश वाकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरात 621 रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेचे अनुपम उदाहरण समोर ठेवले विशेष म्हणजे सर्व रक्त हे शासकीय विभागीय रक्तपेढी ला देण्यात आले. सन 1986 पासून सुरू झालेले रक्तदान शिबिराचे हे महान कार्य अविरतपणे चालू असून गेल्या 36 वर्षांमध्ये 7317 पेक्षा जास्त शिबिरांच्या माध्यमातून 12 लाख 10 हजार 440 बॅग रक्त मंडळातर्फे जमा करण्यात आले आहे. संत निरंकारी सत्संग भवन, श्रीकृष्णनगर, सिडको, एन-9 येथे गुरुवारी सकाळी 8 ते दुपारी 4 या वेळेत हे शिबिर सम्पन्न झाले. या रक्तदान शिबिरामध्ये सामाजिक, राजकीय, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी भेट दिली. शासकीय रक्तपेढी च्या बनकर मॅडम व सहकाऱ्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत इतक्या मोठ्या प्रमाणात रक्तसंकलन केल्या बद्दल निरंकारी फाउंडेशनचे आभार मानले. निरंकारी सेवादलच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मोलखेडा ग्रा.पं. येथे ध्वजारोहण उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** मोलखेडा व हिवरी येथे आजादी का अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे मेरी माटी मेरा देश अभियाना अंतर्गत दि. १५ ऑगस्ट रोजी मोलखेडा गावात ग्रामपंचायत कार्यालयावर राष्ट्रध्वज फडकविण्यात आले.सर्वप्रथम डॉ बाबासाहेब आंबेडकर व सरदार वल्लभभाई यांच्या प्रतिमेला सरपंच सौ मनिषाताई ज्ञानेश्वर वारंगणे व ग्रामसेविका सुरेखा पवार मॅडम यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.तद्नतंर ध्वजारोहन शेख इरफान शेख मुसा व सरपंचती ज्ञानेश्वर वारंगणे यांच्या हस्ते करण्यात आले.तर प्राथमिक आरोग्य केंद्रात सरपंच सौ मनिषाताई ज्ञानेश्वर वारंगणे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. ध्वजाला सलामी देत भारत भूमी की मे एक मिठ्ठी है या आशयाची हतात माती घेऊन भारत भूमीची शपथ घेत असल्याचे दिसून आले.त्याच प्रमाणे सरपंच सौ मनिषाताई ज्ञानेश्वर वारंगणे यांनी पुढील कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तृणधान्य वर्ष निमित्त तृणधान्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने भाषणे व छोटेखानी नाटिका सादर केल्या. गावातून प्रभात फेरी दरम्यान विविध भारत मातेच्या घोषवाक्यांची फलक हाती घेऊन विद्यार्थ्यांनी समाज प्रबोधन केले व स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. यावेळी सरपंच सौ मनिषाताई ज्ञानेश्वर वारंगणे, उपसरपंच बाबींता गुलाबसिंग पवार, ग्रामसेविका सुरेखा पवार मॅडम,स्वाती अतुल इंगळे, शारदाबाई दिगंबर वारांगणे,शालुबाई कैलास शेळके,उषाबाई भीमराव लोढे,शेख इमान शेख इरफान, अभिमान वारांगणे तंटामुक्ती अध्यक्ष,सग्रामसिंग निकुंभ तंटामुक्ती उपाध्यक्ष, ग्रामपंचायत कर्मचारी रामलाल झांबरे, गोपाळ चव्हाण,विजय वारंगणे इतर कर्मचारी, मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# खिदमत -ए -खल्क फाउंडेशन तालुका अध्यक्षपदी शेख आकिब यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** मुक्त पत्रकार व शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रतील कार्याची दखल घेऊन आकिब आसिफ शेख यांची खिदमत -ए -खल्क फोउंडेशनचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा सफीना बागवान यांचे आदेशावर संस्थापक अध्यक्ष इस्माईल शेख यांनी शेख आकिब आसिफ यांना कन्नड तालुका अध्यक्ष पदाचे नियुक्ति पत्र देऊन निवड केली आहे. या निवडीबद्दल महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा सफीना बागवान, वरिष्ट पत्रकार



आसिफ शेख, अरबाज सय्यद , अब्दुल रहेमान, मसरूर अहेमद, दानियाल खान, आतिफ शेख, फरदीन खान, रेहान खान, जावेद खान, तौफीक पठान, अदनान शेख, सोहेल पटेल, ज़मीर खान, वसीम शेख तालुक्यात विवीध संघटना आणि मित्र परिवारनी त्यांचे अभिनंदन करुन त्यांच्या पुढील यशस्वी वाटचलीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# सदगुरू गंगागिरी महाराज सप्ताह नियोजनसाठी सामाजिक संस्थांची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथे दि२१ऑगस्ट ते २८ऑगस्ट या काळात होऊ घातलेल्या गोदा धाम( सरला बेट )च्या सदगुरू गंगागिरी महाराज यांच्या १७६व्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या नियोजन बद्ध कार्यक्रम साठी आयोजक आ,रमेश पा, बोरनारे यांच्या उपस्थितीत मंगळवार ( ता,१५ ) रोजी सप्ताह स्थळी शहरातील सर्व गणेश मंडळे, महिला मंडळे, सामाजिक व धार्मिक मंडळे,विविध संस्था व समाज कार्यकर्ते यांची बैठक संपन्न झाली.

सर्व प्रथम सर्व मंडळव कार्यकर्ते यानी सूचना सांगितल्या सर्वानी जी सेवा समिती सोपविल ती एकजुटीने करू असे सर्वांनी आश्वासन दिले. आ. रमेश पा. बोरनारे व समितीच्या सर्व पदाधिकारी यांनी या आठ दिवस चालणाऱ्या सप्ताहाचे सर्व बाबतीत अत्यंत सूत्रबद्ध व सुटसुटीत नियोजन केले आहे. आ. बोरणारे यांनी पूर्ण नियोजन सादर केले जे अत्यंत व्यवस्थित आहे. त्या अनुषंगाने सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन त्यानी केले. प्रास्ताविक धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. आभार सप्ताह समिती सचिव बाबासाहेब जगताप यांनी मानले.

राजेंद्र पा. साळुंके, पारस घाटे, दिनेश राजपूत, अमोल बोरनारे, अरुण भालेकर यांनी बैठकीचे आयोजन केले. या प्रसंगी रामहरी बापू,डॉ. दिनेश परदेशी, बाळासाहेब संचेती,साबेरखान, कल्याण दांगोडे, कडूभाऊ काळे,लिमेश वाणी, ज्ञानेश्वर टेके,सजन गायकवाड, भगवान तांबे, विश्वनाथ त्रिभुवन, उल्हास ठोंबरे अकिल शेख, मजीद कुरेशी,विशाल संचेती, कैलास साखरे,रणजित चव्हाण, संजय बोरनारे यांच्या सह गंगापूर, श्रीरामपूर येथील भक्त,तालुक्यातील ग्रामीण भागातील भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विजाभज आश्रमशाळा शिक्षक - कर्मचाऱ्यांना तत्काळ वेतन तरतूद उपलब्ध करा : आमदार सुधाकर अडबाले

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या



अनुदानित आश्रमशाळांतील शिक्षक - कर्मचाऱ्यांचे वेतन तीन महिन्यांपासून झालेले नाही. शासनाकडून माहे जून महिन्याची वेतन तरतूद अपूरी प्राप्त झाल्यामुळे सर्वच जिल्ह्यातील निम्या आश्रमशाळांचे वेतन थकीत आहे. तीन महिन्यापासून वेतन न झाल्यामुळे विजाभज आश्रमशाळांच्या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची पाळी आली आहे. त्यामुळे आमदार सुधाकर अडबाले यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री यांना पत्र लिहून तात्काळ तरतूद उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

नागपूर विभागाचे शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी विजाभज आश्रमशाळांच्या वेतनाकरिता होणाऱ्या दिरंगाईबाबत नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात प्रश्न लावून शासनाचे लक्ष वेधले. विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी यापुढे वेतन नियमित करू व वेतनास विलंब झाल्यास कारणीभूत घटकावर शासननिर्णयानुसार कारवाई करू, अशी ग्वाही दिल्यानंतरही वेतनाबाबत जैसे-थे परिस्थिती असल्यामुळे आमदार अडबाले यांनी मुख्यमंत्री नाम. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री नाम. अजित पवार व विभागाचे मंत्री नाम. अतुल सावे यांना पत्र लिहून तात्काळ तरतूद उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या आश्रमशाळांचे वेतन तीन-तीन महीने विलंबाने होणे हे नेहमीचेच झाले आहे. शासन हे आश्रमशाळांच्या वेतनाबाबत सजग नाही असे दिसून येते. अनियमित वेतनाचा शिक्षकांच्या अध्यापणावर परिणाम होत असल्यामुळे या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या बहुजन वर्गातील भटक्या/विमुक्त जातीच्या विद्यार्थ्यांचे फार मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. वेतन तरतूद तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी व यानंतर तरतूद उपलब्ध नसल्यास उणे प्राधिकारातून वेतन काढण्याची सोय उपलब्ध करून देण्यात यावी. तीनही महिन्याची तरतूद तात्काळ उपलब्ध न झाल्यास विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ इतर आश्रमशाळा संघटनांना सोबत घेऊन राज्यव्यापी आंदोलन करेल, असा इशारा आमदार सुधाकर अडबाले यांनी पत्रातून दिला आहे.

# राजू झोडे यांनी रेल्वेच्या कंत्राटी कामगारांना मिळवून दिला न्याय

## कामगारांना मिळाले हक्काचे वेतन



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यातील विरुर स्टेशन, राजुरा, तेलंगणा राज्यातील बोलमपल्ली सह इतर ठिकाणाहून रेल्वेच्या कामासाठी जवळपास 200 कंत्राटी कामगारांना उत्तर प्रदेशातील ललीतपुर येथील कामगाराना राजस्थान च्या पेटी ठेकूदारनी संध्या नावाच्या कंपनी च्या कामावर नेले. मात्र मागील दोन महिन्यांपासून या कामगारांचे वेतन कंपनीने दिले नाही. अशातच हे कामगार बल्लारपूर रेल्वे स्थानकावर उतरून थेट पोलीस ठाण्यात आले. याची माहिती उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे, जंतर मंतर ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांना मिळताच त्यांनी तात्काळ या सर्व कामगारांची व्यथा एकूण घेत त्यांच्या जेवणाची सोय केली. यावेळी बल्लारपूर चे पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांच्याशी चर्चा करून कंपनीच्या व्यवस्थापकाशी चर्चा केली. उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे यांनी कंपनी व्यवस्थापनाची चांगलीच कानउघडणी केल्यानंतर कंपनी व्यवस्थापनाने तात्काळ जवळपास200 कामगारांना वेतन देण्याचे मान्य केले असून या सर्व कामगारांना वेतन मिळाले. यावेळी सर्व कामगारांनी राजू झोडे, नरेश डोंगरे, कर्मवीर सौदागर, श्याम झिलपे, प्रशांत रणदिवे, अनिल सुखदेवे, गोकूल भालेराव, नंदलाल वर्मा, छुटन निषाद, छगल शाहु, पंचशील तामगाडगे जंतर मंतर ग्रुप च्ये आभार मानले असून हे सर्व कामगार आपापल्या गावी रवाना झाले आहे.

# १९ ऑगस्ट रोजी देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्कारांचे वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** विश्व संवाद केंद्र आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी देण्यात येणाऱ्या आद्य पत्रकार देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्काराचे वितरण शनिवार, दि. १९ ऑगस्टला सकाळी १०.३० वाजता होणार आहे. भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते, माध्यमांचे अभ्यासक आणि प्रखर राष्ट्रवादी विचारक शहजाद पूनावाला यांच्या हस्ते फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये एका विशेष समारंभात पुरस्कार वितरण होणार आहे.

अशी माहिती विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी आणि डेक्कन एज्यूकेशन सोसायटीचे नियामक मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. रवींद्र आचार्य यांनी दिली. याप्रसंगी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे नियामक मंडळ परिषद सदस्य मिलिंद कांबळे उपस्थित होते.

अभय कुलकर्णी पुढे म्हणाले की, या पुरस्कार उपक्रमाचे हे १२ वे वर्ष असून देवर्षी नारद यांच्या नावे हे पुरस्कार दरवर्षी देण्यात येतात. पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या चार पत्रकारांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. पुरस्काराचे स्वरूप ज्येष्ठ पत्रकार यांना २१ हजार रुपये तर अन्य तीन पुरस्कार ११ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे राहील. यंदाच्या ज्येष्ठ पत्रकार पुरस्कार नगरचे दिव्यमराठीचे ब्युरो चीफ अनिरुद्ध देवचक्के यांची तर अन्य तीन पुरस्कारासाठी अरुण मेहेत्रे, सुषमा नेहरकर, आशुतोष मुगळीकर यांची निवड झाली आहे. यापूर्वी हे पुरस्कार 'ए बी पी माझा'चे संपादक राजीव खांडेकर, 'झी२४ तास'चे डॉ. उदय निरगुडकर, 'तरुण भारत' बेळगावचे संपादक किरण ठाकूर, 'दिव्य मराठी'चे संपादक प्रशांत दीक्षित, 'महाराष्ट्र टाईम्स'चे संपादक पराग करंदीकर, 'लोकसत्ता' पुण्याचे निवासी संपादक मुकुंद संगोराम, ज्येष्ठ पत्रकार कै. दिलीप धारूरकर, ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर 'आज का आनंद'चे संपादक श्याम अग्रवाल, ज्येष्ठ पत्रकार अभिजित अत्रे, नाशिकच्या देशदूतच्या संपादक वैशाली बालाजीवाले आदींना देण्यात आले आहेत अशी माहिती त्यांनी दिली. हा कार्यक्रम शनिवार दि. १९ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये होणार आहे. यावेळी शहजाद पूनावाला यांचे 'समाजमाध्यम आणि डिजिटल मीडिया युगातील पत्रकारिता' या विषयावर व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या परिषद व नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे असतील. या समारंभास माध्यम क्षेत्रातील पत्रकार व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन विश्व संवाद केंद्र आणि डेक्कन एज्यूकेशन सोसायटीच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी डॉ. रवींद्र आचार्य यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने विविध माध्यमांच्या क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या शिक्षणाच्या संधी आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या स्वायत्त डीईएस पुणे विद्यापीठ या विषयी माहिती दिली. राष्ट्रीय विचारांनी प्रेरित विश्व संवाद केंद्राचे देशभर कार्य असून विविध राज्यातून ३० केंद्र कार्यरत आहेत.

# मराठवाडा व अमरावती विद्यापीठ अभ्यासक्रमात प्रा.वा.ना. आंधळे यांच्या कवितांचा समावेश

आधुनिक केसरी न्यूज

**एरंडोल :** येथील सुप्रसिद्ध कवी तथा गझलकार



कवी प्रा.वा.ना.आंधळे यांच्या कवितांचा मराठवाडा विद्यापीठ व अमरावती विद्यापीठ पदवी अभ्यासक्रमात या शैक्षणिक वर्षापासून सामावेश करण्यात आला आहे. अध्यात्मिक संस्कार करणारी 'मराठी माती' ही कविता डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या द्वितीय वर्ष कला व विज्ञान या वर्गांसाठी असून 'सण' ही कृषी संस्कार करणारी कविता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अभ्यासक्रमात प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गासाठी नेमण्यात आलेली आहे. चार दशकांपासून अव्याहत काव्यलेखन - प्रकाशन करणाऱ्या प्रा.आंधळे यांनी लेक वाचवा अभियानांतर्गत प्रकाशित केलेली 'आई मला जन्म घेऊ दे' या पोस्टर कवितेने विश्वविक्रम नोंदवला असून पंचेचाळीस भारतीय भाषांमध्ये या कवितेचे अनुवाद झाले आहेत.

यापूर्वीही प्रा.आंधळे यांच्या कविता बालभारती इयत्ता तिसरी, युवकभारती इयत्ता अकरावी, मुंबई विद्यापीठ प्रथम वर्ष कला वर्गासाठी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ एम. ए. प्रथम वर्ष वर्गासाठी आणि गुजरात राज्य शालेय अभ्यासक्रमांतर्गत इयत्ता चौथीसाठी लावण्यात आल्या आहेत. त्यांच्या या यशाचे साहित्यिक, शैक्षणिक व सामाजिक स्तरातून अभिनंदन होत आहे.

# राष्ट्रवादी भवनावर दोन्ही गटांकडून झेंडावंदन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** गेल्या महिनाभरापासून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातील दोन्ही गटांमध्ये वाकयुद्ध सुरू आहे. स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी राष्ट्रवादी भवनावर आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटातील सर्व कार्यकर्त्यांनी एकमेकांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देत एकत्रितपणे ध्वजारोहण केले. दोन्ही गटाकडून स्वातंत्र्य दिनी एकत्रित येणे हा चर्चेचा विषय होता. गेले काही दिवसापासून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये उघडपणे दोन गट पडलेले होते. परंतु स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी अतिशय सामंजस्य दर्शन धुळे शहरांमध्ये दिसून आले. शरद पवार साहेब व अजित पवार साहेब गटाच्या सर्व कार्यकर्त्यांनी जिल्ह्यामध्ये अतिशय ऐक चांगला संदेश दिला. एकत्रितपणे ध्वजारोहणव राष्ट्रगीत करून एकमेकांबरोबर अल्पोपहार व चहापाणी सुद्धा केली. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या दोघं गटातील दोन दोन प्रमुख पदाधिकाऱ्यांनी एकत्र येऊन एकत्रित ध्वजारोहण केले. स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहण माजी जिल्हाध्यक्ष किरण शिंदे, शहर



जिल्हाध्यक्ष रणजीतराजे भोसले, युवा नेते सारांश भावसार, जोसेफ अण्णा मलबारी, एन. सी पाटील, कल्पना महाले यांच्या संयुक्त हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर किरण शिंदे व रणजीत राजे भोसले यांनी सर्व कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन मंगेश जगताप व भिका नेरकर यांनी केले. यावेळेस दोघं गटातील मोठ्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

# वाहनाच्या धडकेने बिबट्याचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली:** अज्ञात वाहनाने धडक दिल्याने बुधवारी पहाटे एका बिबट्याचा मृत्यू झाला. वाळवा तालुक्यातील चिकुर्डे ते ऐतवडे बुद्रुक मार्गावरील देवर्डी गावच्या हद्दीमध्ये ही घटना घडली. मृत बिबट्या नर जातीचा असून त्याचे वय तीन वर्षाचे आहे. आज पहाटे अज्ञात वाहनाने धडक दिल्याने गंभीर जखमी अवस्थेत बिबट्या रस्त्याकडेला पडला होता. याची माहिती स्थानिकांनी वन विभागाला तात्काळ दिली. मात्र, वन कर्मचारी येईपर्यंत बिबट्याचा जागीच मृत्यू झाला. बिबट्याचा अपघाती मृत्यू झाल्याची माहिती मिळताच बघ्याची घटनास्थळी गर्दी झाली होती. परिसरात उस शेती मोठ्या प्रमाणात असून उसाच्या फडालाच बिबट्याने आश्रय स्थान केले आहे.



# जातेगाव रस्ता वाहतुकीसाठी बंद

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** जातेगाव रस्त्यावरील जैन मंदिरापासून ते जुने पोलीस ठाणे या ठिकाणी सिमेंट रस्त्याचे काम सुरू असून रस्त्याचे खोदकाम करण्यात आले आहे.यामुळे रस्ता बंद करण्यात आला आहे सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता साहेबराव जाधव यांनी अशी माहिती दिली जुने पोलीस ठाणे या रस्त्याचे सिमेंट करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाचे वतीने करण्यात येत असून या रस्त्याचे खोदकाम करण्यात आले असून या ठिकाणी सिमेंट रस्त्याचे काम सुरू आहे त्यामुळे वाहतुकीस हा रस्ता बंद करण्यात आला असून जड वाहनांना या रस्त्यावरून जाण्यास बंद करण्यात आले आहे.



# रक्त देऊन इतरांचे प्राण वाचवणे ही अहिंसा

## ८० जणांचे रक्तदान : अंनिसच्या शिवाजीनगर शाखेचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या १० व्या स्मृतिदिनानिमित्त १५ ऑगस्ट रोजी एस एम जोशी सभागृह येथे रक्तदान शिबिर झाले. 203 जणांची नोंदणी झाली, त्यातील 80 जणांचे रक्तदान झाले. यंदाचे हे तिसरे वर्षे होते. पहिल्या वर्षी 84, गेल्यावर्षी 75, तर यंदा 80 जणांनी रक्तदान केले. खून करणे ही हिंसा आहे, तर खून देऊन इतरांचे प्राण वाचवणे ही अहिंसा आहे, असा संदेश देणे हे या शिबीराचे वैशिष्ट्ये आहे. डॉक्टर दाभोलकर यांना रक्तबंबाळ करून त्यांचा प्राण घेणाऱ्या हिंसक प्रवृत्तीला, दाभोलकरांच्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान करून इतरांचे प्राण वाचवण्याची थेट कृती हे अहिंसात्मक, मानवतावादी उत्तर आहे.

सव्वा दोनशेहून अधिक नागरिक, कार्यकर्ते, मान्यवर रक्तदानासाठी येऊन गेले. विविध क्षेत्रातील मान्यवर देखील उपस्थित होते. संशोधक लेखक साहित्यिक अच्युत गोडबोले, राज्य आरोग्य अधिकारी डॉ. प्रदीप आवटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते अंकुश काकडे, सामाजिक कार्यकर्ते प्रा. सुभाष वारे, मानव कांबळे, युवानेते छाया काविरे, सुदर्शन चखाले, अनिल गायकवाड, राहुल ससाणे, तुकाराम शिंदे, साहित्यिक आसावरी निफाडकर, विनायक होगाडे, श्वेता सीमा विनोद, प्रकाशक वितरक शरद अष्टेकर, पत्रकार मिनाज लाटकर, राहूल शेळके, अविनाश टिंगरे, राज्य अधिकारी मनीषा गंपले, कलाकार कृतार्थ शेवंगावकर, गौतमी अहिरे, राम सैदपुरे, प्राध्यापक प्रकाश पवार आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाला जागा आणि व्यवस्था एस एम जोशी सोशलिस्ट फाउंडेशनने उपलब्ध करून दिली. रमेश धर्मावत, प्रांजल पाठक यांचे सहकार्य लाभले. ससून रक्त



पेढीने रक्तसंकलनास सहकार्य केले. शिवाजीनगर शाखेच्या कार्यकर्त्यांनी अत्यन्त चिकाटी, निष्ठेने उपक्रम पार पाडला. संयोजनामध्ये माधुरी गायकवाड, स्वप्नील भोसले, आकाश छाया, रविराज थोरात, प्रतीक कालेकर, श्याम येणगे, विनोद लातूरकर, एकनाथ पाठक, सतीश जाधव, मयूर पटारे, कपिल क्षीरसागर, अविनाश इंगळे, अक्षय दावडीकर, प्रवीण खुंटे, लालचंद कुंवर, निशांत धाइंजे, रविकिरण काटकर, रवी आमले, प्रिया आमले, निखिल सुक्रे, मनोहर पाटील आदी कार्यकर्ते सक्रिय होते.

# शेतकऱ्यानेच वाघाला मारल्याचे उघड

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** तुमसर तालुक्यात खंदाड या गावातील रतनलाल वाघमारे याच्या शेतामध्ये काल कुजलेल्या अवस्थेत एका वाघाचा मृतदेह आढळल्याच्या वृत्ताने खळबळ उडाली होती. वाघाची शिकार की मृत्यू याबाबत तपास सुरू असताना या शेतकऱ्यानेच वाघाला मारले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. भीतीपोटी त्याने हा सर्व प्रकार लपवून ठेवला असल्याचे आतापर्यंत झालेल्या चौकशीतून पुढे आले असले तरी यातून आणखी काही धागेदोरे मिळतात का याचा तपास वन विभागाचे अधिकारी करीत आहेत. तुमसरवरून २८ किलोमीटर अंतरावरील वन परीक्षेत्रालगतच्या धानाच्या शेतीमध्ये सात दिवसांपूर्वी वाघाचा मृत्यू झाला होता. शेतात रानडुकरांचा धुमाकूळ असल्याने वाघमारे याने शेतात विद्युत तारा टाकून ठेवल्या होत्या. रानडुकरासाठी त्याने हा सापळा रचला होता. मात्र या परिसरात वाघाचा संचार असतोच. अनेकदा शेतात वाघाचे दर्शनही झाले आहे. त्यामुळे ९ ऑगस्ट रोजी वाघ या शेतशिवारात वावरत असताना वाघमारे यांनी लावलेल्या सापळ्यात तो अडकला आणि तीव्र विद्युत धक्क्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. रानडुक्कर मेला असावा म्हणून वाघमारे याने जाऊन पाहिले असतात त्यांना तेथे वाघ मेलेल्या अवस्थेत दिसला. मृतावस्थेत वाघाला बघून त्याची घाबरगुंडी उडाली. भीतीपोटी त्याने वाघाचा मृतदेह झुडूप आणि पालापाचोळा याने झाकून ठेवला. मात्र सात दिवसांनंतर मृतदेहाला दुर्गंधी येवू लागली. काल सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास पोलीस पाटील कमलेश भारद्वार यांना धानाच्या एका शेतामध्ये झाडांच्या फांद्यांनी झाकून ठेवलेला वाघाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत दिसताच त्यांनी वन विभागाला याबाबत माहिती दिली. शेतकऱ्याकडे विचारणा केली असता, तीन दिवसांपूर्वी या मृत वाघाला झाडाच्या फांद्यांनी झाकून ठेवल्याचे त्याने खोटे सांगितले. मात्र या प्रकरणी शेतकरी रतनलाल वाघमारे यांच्या घरी वन विभागाने शोध घेतला असता विजेचे वायर आणि ते पसरविण्यासाठी काठ्या आढळल्या.

# 'सिद्धार्थ'मध्ये स्वातंत्र्यदिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** पडेगाव येथील सिद्धार्थ ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालयात ७६ वा स्वातंत्र्य दिन आणि महाकवी वामनदादा कर्डक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. माजी उपमहापौर किशोर थोरात यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी बोलताना थोरात म्हणाले, "स्वातंत्र्याचा लाभ तळागाळातील शोषितांपर्यंत पोहोचला तरच खऱ्या अर्थाने या स्वातंत्र्याला अर्थ आहे. देशात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाची प्रस्थापना झाली पाहिजे."

याप्रसंगी प्रा. सुनील मगरे, प्राचार्य डॉ. मनोहर वानखेडे, डॉ. मधुकर ताजने, बबनराव मुळे, गंगाधर मुळे, दिलीप जाधव, लक्ष्मण बनकर, अण्णासाहेब खोतकर, अण्णासाहेब वाकडे, नवनाथ मुळे, खंडेराव मुळे, सुधाकर बागुल आदींची उपस्थिती होती.



त्याचबरोबर महाकवी वामनदादा कर्डक यांची जयंती ही महाविद्यालयात साजरी करण्यात आली. त्यानिमित्त गीत गायन स्पर्धा घेण्यात आली. सुरुवातीला डॉ. मनोहर वानखेडे यांनी वामनदादा कर्डक यांच्या जीवन व कार्याचा परिचय करून दिला. डॉ. सुकेश जाधव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# संघ कार्यालय मोतीबाग येथे ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** भारतीय संस्कृती संवर्धक संस्थेचे मोतीबाग संघ कार्यालय येथे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ.अनंतराव देशमुख यांच्या हस्ते सकाळी ८ वाजता ध्वजारोहण झाले.

यावेळी पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर, कसबा भाग संघचालक प्रशांत यादव आणि भारतीय संस्कृती संवर्धक संस्थेचे सदस्य प्रकाशराव आठवले उपस्थित होते.

डॉ. देशमुख यांनी यावेळी आधुनिक शिक्षण पद्धती हा विषय अत्यंत सोप्या शब्दात समजावून सांगितला. ते म्हणाले की, नव्याने येणारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण एन. ई. पी -२०२० हे देशाचा सुजाण व सुसंस्कृत नागरिक निर्माण होण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आले आहे.मौलिक आणि दर्जेदार शिक्षण,नाविन्य आणि संशोधन यावर या धोरणाचा मसुदा तयार करण्यात आलेला आहे.

यावेळी कसबा भागाचे भागसंघचालक प्रशांत यादव म्हणाले की, संघाची दैनंदिन शाखा हे गुरुकुल शिक्षणाचे व्यासपीठ झाले ते संस्कारपीठ झाले आहे, त्यातूनच संस्कार घडत असतात. विद्यापीठ व संस्कारपीठ ह्यांची तुलना करायची नाही मात्र दोघांचे कार्य समाजाचे कार्य आहे.चार भिंतीच्या बाहेर आपला परिवार आहे हे संस्काराचे पंख संघातून मिळतात. या कार्यक्रमासाठी कसबा भागातील विविध कोचिंग क्लासेसचे शिक्षक आणि अभ्यासिका चालवणारे संचालक यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते भारतमातेची प्रतिमा देऊन



सन्मान करण्यात आला.

यावेळी उपस्थित नागरिकांनी व स्वयंसेवकांनी भारतमातेचे पूजन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक भालचंद्र जोशी यांनी तर सूत्रसंचालन आशिष सोमण यांनी केले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर

घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर